
पुणे, शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 269 • वर्ष ३ रे, अंक २६९ • किंमत ₹ ६ • पाने : १०+२ = १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवन



## आपली संस्कृती व इतिहासाची महती जाणण्यासाठी, पुणे महापालिकेकडून हेरिटेज वॉकमध्ये समाविष्ट असलेल्या या ऐतिहासिक स्थळाला अवश्य भेट दिली पाहिजे.


श्रीमंत भाऊसाहेब रंगारी
॥ उत्सवकर्ते ॥

ब्रिटीश राजवटीतून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आणि त्यासाठी सर्व जाती धर्मांना एकत्र आणण्यासाठी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानुसार त्यांनी पुण्यात १८९२ साली श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची स्थापना केली. ही गणपतीची पर्यावरणपूरक मुर्ती १३३ वर्षे जुनी असून स्वतः भाऊसाहेबांच्या प्रतिभेचा अद्भुत आविष्कार आहे. श्री गणेशाच्या रथाची निर्मिती १८९२ साली झाली. तेव्हापासून गणपतीची मिरवणूक याच रथातून संपन्न होते. क्रांतिकारकांचे माहेरघर असलेल्या भाऊसाहेब रंगारी भवनाला १४० वर्षे पूर्ण झाली असून त्यात गुप्तदालन, भुयारी रस्ते, ब्रिटिशकालीन ऐतिहासिक शस्त्रास्त्रे, ईस्ट इंडिया कंपनीची पेटी आदी वैशिष्ट्ये पहायला मिळतात. वाड्याला सेंट्रल लॉकिंग सिस्टीम देखील आहे. या ऐतिहासिक ठेव्यामुळे हे भवन इतर राज्यांतून व परदेशातून पुण्यात येणाऱ्या पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

आता भाऊसाहेब रंगारी भवनाची ऐतिहासिक वारसा स्थळ म्हणून घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय शहरातील प्रसिध्द ऐतिहासिक वास्तूंची पर्यटकांना पाहणी करता यावी यासाठी महापालिकेने जो 'हॅरिटेज वॉक' केला आहे, त्यामध्येही भवनाचा समावेश करण्यात आला आहे.


पूर्वी | आता



पूर्वी | आता


पूर्वी | आता


पूर्वी | आता


पूर्वी | आता


पूर्वी | आता


पूर्वी | आता


पूर्वी | आता

> 'इंद्राणी बालन फाऊंडेशन'च्या माध्यमातून या ऐतिहासिक वास्तूचा जीर्णोद्धार करता आला याचा उत्सव प्रमुख आणि एक गणेशभक्त म्हणून मनस्वी आनंद वाटतो.

\- मा. पुनीत बालन, विश्वस्त-उत्सव प्रमुख



॥ प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ॥
॥ भक्तावासं स्मरेनित्यम् आयुष्कामार्थ सिध्दये ॥

• पुणे, शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ • वर्ष ३ रे, अंक २६९ • किंमत ₹ ६ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 269

राष्ट्रसंचार
BEYOND THE NEWS
@rashtrasanchar.com • पाने : १०+ २ = १२

# 'श्री' चे आगमन

**जगभरातील गणेशभक्तांचे आकर्षण असलेल्या आणि वैभवशाली परंपरा लाभलेल्या पुण्यनगरीच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला आज उत्साहात प्रारंभ होत आहे. गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी गेल्या महिनाभरापासून सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची लगबग सुरू असून, बाप्पाचा उत्सव दणक्यात साजरा करण्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील प्रत्येक माणसाला बाप्पाच्या आगमनाची आस लागलेली असते. आज लाडक्या बाप्पाचे आगमन शुभ मुहूर्तावर होत आहे. हिंदू पंचांगानुसार गणेश चतुर्थी दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला साजरी केली जाते. यंदा ही तिथी आज ७ सप्टेंबर २०२४ ला. तर १७ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी असणार आहे. या काळात ज्येष्ठा गौरी आवाहन, पूजन आणि गौरी विसर्जनही केले जाईल. पाच दिवसांच्या गणपती १२ सप्टेंबरला विसर्जन केले जाईल. पंचागानुसार गणेश चतुर्थीचा शुभ मुहूर्त हा २ तास ३१ मिनिटांचा असणार आहे. परंतु हा संपूर्ण दिवस चांगला असल्याने गणेश स्थापना कधीही करता येऊ शकते. गणेश चतुर्थी ही शनिवारी ७ सप्टेंबरला दुपारी ३ वाजून १ मिनिटांनी सुरु होईल.

**गणपती बाप्पा मोरया**
**मंगलमूर्ती मोरया**







# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे


## सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२४

वर्ष १३२वे

**'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना** आज शनिवार दि. ७/०९/२०२४ सकाळी ११.११ वा.
प.पू.आदरणीय श्री ज्ञानराज महाराज माणिकप्रभू, पीठाधिपती श्री माणिकप्रभू संस्थान, माणिकनगर, कर्नाटक यांच्या शुभहस्ते

**देखावा व विद्युत रोषणाईचे उद्घाटनः** "जटोली शिव मंदिर, हिमाचल प्रदेश" सायं. ७ वाजता
मा.ना.श्री मुरलीधरजी मोहोळ, केंद्रिय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री

**ऋषि पंचमीः** दि. ८ सप्टेंबर, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणेः मा.डॉ.अरुणाताई ढेरे, ज्येष्ठ साहित्यिक, कवयित्री ● विशेष उपस्थितीः मा.सौ.वृषालीताई श्रीकांत शिंदे


प.पू.श्री ज्ञानराज महाराज माणिकप्रभू

भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज शनिवार दि. ७ सप्टेंबर ते मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.

**दैनंदिन कार्यक्रमः**
श्रींचे आगमन मिरवणूक - दि. ०७ सप्टेंबरः स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजाः दि. ०८ ते १६ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयागः शुभारंभ - ०७ सप्टेंबर - दु. १ वा.
दि. ८ ते ११ सप्टेंबर स. ८ ते १२, दु.१ ते ५
सहस्त्राभिषेकम्, लक्षार्चना व गणेशयागः दु.१२ ते ४
दि. १२, १३, १४ सप्टेंबरः श्रींचे मंदिरात
हरी जागरः समस्त वारकरी बंधु
दि. ८ सप्टेंबरः रात्री १० ते १२
मंत्र जागरः दि. १४ सप्टेंबर - दु. ३ ते ५
सत्यविनायक पूजाः दि. १६ सप्टेंबरः सायं.५ ते ६
महिला हळदी-कुंकूः दि. १६ सप्टेंबरः सायं.६ ते ८
"श्री उमांग मलज" रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक
दि. १७ सप्टेंबर २०२४ - दु. ४ वाजता

E-mail: contact.dhgt@gmail.com
jayganesh.dhgt@gmail.com


मा.ना.श्री.मुरलीधरजी मोहोळ


मा.डॉ.अरुणाताई ढेरे

वेबसाईट क्युआर कोड
लाईव्ह दर्शन क्युआर कोड


जटोली शिव मंदिर, हिमाचल

ट्रस्टला मिळणाऱ्या देणग्या आयकर कलम ८०जी अन्वये सवलतीस पात्र

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे**
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोनः २४४९२०००

बाप्पांचे ॲप डाऊनलोड कराः २४ तास बाप्पांचे थेट दर्शन
**दररोज बाप्पांची आरतीः** YouTube facebook Instagram


## At a Glance

### जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात दिशाभूल प्रकरणी गुन्हा दाखल



**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आणि शेतकऱ्यांना मदत याबाबत खोटी माहिती पसरवून जनतेची दिशाभूल केल्याप्रकरणी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. चुकीची माहिती पसरवून सरकारची बदनामी केल्याप्रकरणी संभाजीनगर एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात बीएनएसकलम ३५३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. » पान ७ वर

### पोर्शे अपघात प्रकरणात सुनील टिंगरेंचा संबंध?



**पुणे:** कल्याणीनगर भागात भरधाव पोर्शे मोटारीने दिलेल्या अपघातात संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. अपघात प्रकरणात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालच्या मुलाला ताब्यात घेण्यात आले. अगरवालला मदत करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे मदत केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांची याप्रकरणात चौकशी करण्यात आली. टिंगरे यांचा अपघात प्रकरणाशी संबंध असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. » पान ७ वर

### निवडणुकीसाठी भाजपचा मेगा प्लॅन



**मुंबई :** भाजपच्या गोटातून एक महत्वाची बातमी पुढे आली आहे. आगामी विधानसभेच्या अनुषंगाने भाजपचं मेगा प्लॅनिंग करण्यात आल्याची माहिती हाती आली आहे. भाजपच्या वतीने पक्षातील चार दिग्गज नेत्यांवर महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नितीन गडकरी देवेंद्र फडणवीस , चंद्रशेखर बावनकुळे आणि रावसाहेब दानवे या चार नेत्यांवर विधानासभेसाठीची महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.दरम्यान, येत्या आठवड्याभरात 20 स्टार प्रचारकांची व्यवस्थापन समिती जाहीर होणार आहे. निवडणूक व्यवस्थापन समितीचे रावसाहेब दानवे पाटील हे प्रमुख संयोजक असणार आहेत. तर अशोक चव्हाण, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, विजया रहाटकर, प्रवीण दरेकर, भाई गिरकर, अशोक नेते, अतुल सावे, संजय कुटे, जयकुमार रावल, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ यांचा देखील या समितीत समावेश असणार आहे.

### आता फोगाट-पुनियाची राजकीय आखाड्यात एन्ट्री



**नवी दिल्ली :** प्रसिद्ध कुस्तीपटू विनेश फोगाट आणि बजरंग पुनिया यांनी अखेर काँग्रेसमध्ये प्रवेश केला. हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सक्रिय राजकारणात उतरण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. पक्ष प्रवेशानंतर विनेश आणि बजरंग दोघेही निवडणूक लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही कुस्तीपटूंनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि इतर वरिष्ठ नेत्यांची १० राजाजी मार्गावरील निवासस्थानी भेट घेतली. तत्पूर्वी, ४ सप्टेंबर रोजी त्यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचीही भेट घेतली होती. त्याच भेटीत त्यांचा काँग्रेस प्रवेश निश्चित झाल्याचे मानले जाते. » पान ७ वर


More than Three Decades of Academic Excellence

# SINHGAD INSTITUTES

Sinhgad Technical Education Society, Pune — तमसो मा ज्योतिर्गमय — Sinhgad Institutes

All the following institutes are Approved by AICTE / Pharmacy Council of India; Recognized by Government of Maharashtra & Affiliated to Savitribai Phule Pune University

# ADMISSIONS OPEN : A.Y. 2024-25

Applications are invited from eligible candidates for admissions of **1) First Year and Direct Second Year of B.E. / B.Pharm 2) First Year of M.E. / MCA / M. Pharm 3) First Year and Direct Second Year (Lateral Entry) of MBA** under **Institute Level Quota** or **vacant seats against CAP Courses**, as applicable as per the eligibility criteria for the A. Y. 2024-25.

## ENGINEERING COURSES

**SINHGAD COLLEGE OF ENGINEERING**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune-411041 Phone: 020 - 24354705 / 24100234
B. E. ▸ DTE Code: EN 06177 M. E.
Principal : Dr. Shashikant D. Lokhande [09011030579]

**SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ENGINEERING**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone: 020 - 24354938
B. E. ▸ DTE Code: EN 06178 M. E.
Principal : Dr. Arvind V. Deshpande [09860906353]

**NBN SINHGAD TECHNICAL INSTITUTES CAMPUS**
**NBN SINHGAD SCHOOL OF ENGINEERING**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone: 020 - 24355041 / 42
B. E. ▸ DTE Code: EN 06772
Principal : Dr. Shivprasad P. Patil [08550990118]

**SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY AND SCIENCE**
Narhe Gaon, Via Dhayari, Off Sinhgad Road, Pune - 411 041 Phone: 020 - 66831702 / 03 / 12 / 17
B. E. DTE Code: EN 06182
Principal : Dr. Shriram D. Markande [08308816104]

**SINHGAD ACADEMY OF ENGINEERING**
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048 Phone: 020 - 67571115 / 16 / 18
B. E. ▸ DTE Code: EN 06187 M. E.
Principal : Dr. Kishor P. Patil [08308816105]

**RMD SINHGAD TECHNICAL INSTITUTES CAMPUS**
**RMD SINHGAD SCHOOL OF ENGINEERING**
Warje, Off Westerly Bypass Road, Pune - 411058 Phone: 020 - 29996611 / 22 / 33
B. E. ▸ DTE Code: EN 06769 M. E.
Principal : Dr. Vaibhav V. Dixit [09822777265]

**SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY**
Kusgaon (Bk), Lonavala, Dist. Pune - 410401 Phone: 02114 - 673340 / 42 / 407 / 477 / 356
B. E. ▸ DTE Code: EN 06185 M. E.
Principal : Dr. Sachin D. Babar [07391041368]

**SKN SINHGAD INSTITUTES OF TECHNOLOGY & SCIENCE**
Kusgaon (Bk), Lonavala, Dist. Pune - 410401 Phone: 02114 - 673393 / 349 / 350 / 352
B. E. ▸ DTE Code: EN 06770
Principal : Dr. Milind S. Rohokale [09552569863]

## MANAGEMENT COURSES

**SINHGAD MANAGEMENT INSTITUTES**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24358360
MBA ▸ DTE Code: MB 6113
MCA ▸ DTE Code: MC 6231
Directors:
MBA: Dr. (Mrs.) Prachi Pargaonkar [09620335006]
MCA : Dr. (Ms.) Chandrani Singh [08805010746]

**SKN SINHGAD SCHOOL OF BUSINESS MANAGEMENT**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24354036
MBA ▸ DTE Code: MB 6741
Director : Dr. (Mrs.) Priya Agashe [08975769599]

**SINHGAD INSTITUTE OF MANAGEMENT & COMPUTER APPLICATION**
Narhe Gaon, Via Dhayari, Off Sinhgad Road, Pune - 411 041 Phone : 020 - 66831896 / 907
MBA ▸ DTE Code: MB 6131
MCA ▸ DTE Code: MC 6239
Director: MBA : Dr. Vijaya Puranik [09657725091]
I/c Director : MCA : Dr. Vijaya Puranik [09657725091]

**SINHGAD INSTITUTE OF BUSINESS ADMINISTRATION & RESEARCH**
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048 Phone : 020 - 67571101 / 02
MBA ▸ DTE Code: MB 6132
MCA ▸ DTE Code: MC 6236
Director: MBA : Dr. Dhananjay Mandlik [09623448939]
Director: MCA: Dr. (Mrs.) Netra Patil [09527012626]

**SINHGAD BUSINESS SCHOOL**
Erandwane, Off. Karve Road, Pune - 411004 Phone : 020 - 25434314 / 25431001
MBA ▸ DTE Code: MB 6136
Director : Dr. Shriram Dawkhar [07391041482]

**NBN SINHGAD TECHNICAL INSTITUTES CAMPUS**
**NBN SINHGAD SCHOOL OF MANAGEMENT STUDIES**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone: 020 - 24355041 / 42
MBA ▸ DTE Code: MB 6772
I/c HoD : Dr. Prakash Pise [07030209772]

**SINHGAD INSTITUTE OF BUSINESS ADMINISTRATION & COMPUTER APPLICATION**
Kusgaon (Bk), Lonavala, Maval, Dist. Pune - 410401 Phone : 02114 - 673306 / 07 / 08
MBA ▸ DTE Code: MB 6205
Director : Dr. Vidya Nakhate [09881476714]

**RMD SINHGAD TECHNICAL INSTITUTES CAMPUS**
**RMD SINHGAD SCHOOL OF MANAGEMENT STUDIES**
Warje, Pune-Mumbai Bypass Highway, Pune - 411058 Phone: 020 - 29996611 / 22 / 33
MBA ▸ DTE Code: MB 6769
Dean : Dr. Swati Vijay [09607162777]

**SINHGAD COLLEGE OF ENGINEERING (MBA Department)**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24354705
MBA ▸ DTE Code: MB 6177
HoD : Dr. Mamta Mishra [09371636797]

**SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ENGINEERING (MBA Department)**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24354938
MBA ▸ DTE Code: MB 6178
HoD : Dr. Sachin Wankhede [07030209763]

**SHRINATH SHIKSHAN PRASARAK MANDAL'S RMD SINHGAD MANAGEMENT SCHOOL**
Kondhapuri, Tal: Shirur, Dist: Pune - 412209 Phone : 08669912747 / 48
MBA ▸ DTE Code: MB 6127
Director : Dr. Dinesh Doke [09011033358]

## PHARMACEUTICAL COURSES

**SINHGAD COLLEGE OF PHARMACY**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone : 020 - 24354720
B. Pharm ▸ DTE Code: PH 6358
M. Pharm ▸ DTE Code: MP 6358
Principal : Dr. Rajesh B. Patil [09822100527]

**SINHGAD INSTITUTE OF PHARMACY**
Narhe, Off Westerly Bypass Road, Pune - 411 041 Phone : 020 - 66831801 / 02
B. Pharm ▸ DTE Code: PH 6363
M. Pharm ▸ DTE Code: MP 6363
Principal : Dr. Moreshwar P. Mahajan [09850273807]

**SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF PHARMACY**
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048 Phone: 020 - 67571171 / 72
B. Pharm ▸ DTE Code: PH 6362
M. Pharm ▸ DTE Code: MP 6362
I/c Principal : Dr. Minal R. Ghante [07391076406]

**SINHGAD INSTITUTE OF PHARMACEUTICAL SCIENCES**
Kusgaon (Bk), Lonavala, Maval, Dist. Pune - 410401 Phone: 02114 - 673322 / 24
B. Pharm ▸ DTE Code: PH 6378
Principal : Dr. (Mrs.) Ruksana Pinjari [08411970131]

**Eligibility:** As per the applicable norms laid down by Government of Maharashtra, Savitribai Phule Pune University and as per the norms of the respective competent authority for admissions.
**Admission Procedure:** The candidate desirous for admissions under **Institute Level Quota or vacant seats against CAP** should obtain the Admission Form & Prospectus available at respective institute's office during working hours. The duly filled in Admission Form along with testimonials with Rs. 1000/- for Under Graduate Courses (B. E. / B. Pharm) and Rs. 1500/- for Post Graduate Courses (M.E. / MBA / MCA / M.Pharm) as Admission Form Fee and the requisite fees should be submitted in the respective institute's office during working hours. The admissions will be given on the basis of merit. The candidate should directly approach to the **Principal / Director** of the Institute or **Dy. Registrar (Admissions) - 09623448939 / 073500 07033**.
**Note:** Sinhgad Institutes has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. The candidates are advised to remain in touch with the Dy. Registrar (Admissions) / College Principal / Authorized College Staff only.

19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune (Maharashtra, India) - 411004 Phone: +91 20 25431001 | Email: stes@sinhgad.edu

*Subject to Pune Jurisdiction only

www.sinhgad.edu

Prof. M. N. Navale
Founder President

# चंपाईंच्या आगमनाने काय साधणार?

झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे ज्येष्ठ नेते चंपाई सोरेन यांनी अखेर मंत्रिपदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. या बंडानंतर त्यांनी केलेल्या भाजपा प्रवेशामुळे झारखंडच्या राजकारणावर सखोल परिणाम होणार आहे. चंपाई यांचे महत्त्व ओळखत भाजपने अगोदरपासूनच त्यांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. झारखंडच्या कोल्हान भागात मागील विधानसभा निवडणुकीच्या काळात एकही जागा मिळवू न शकणारा भाजपा आता आगामी विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळवण्यासाठी आतूर झाला आहे. भाजप नेत्यांच्या मते, चंपाई यांनी झारखंड मुक्ती मोर्चा सोडल्यानंतर भाजपला कोल्हान भागात अधिक कष्ट घ्यावे लागणार नाहीत. दुसरीकडे झामुमोला मोठा राजकीय धक्का बसू शकतो. कोल्हान भागात चंपाईंची जबरदस्त पकड - माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांचा संबंध झारखंडच्या कोल्हन विभागाशी आहे. या भागात सरायकेला, पूर्व सिंहभूम आणि पश्चिम सिंहभूमसारखे जिल्हे येतात. विधानसभेचा विचार केला तर या तीन जिल्ह्यांत विधानसभेच्या चौदा जागा आहेत. झारखंडमध्ये २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपला या भागात मोठा झटका बसला आणि तेथे खाते देखील उघडता आले नव्हते. दुसरीकडे झारखंड मुक्ती मोर्चाने कोल्डान विभागात मोठी मुसंडी मारत ११ जागा जिंकल्या. दोन जागांवर काँग्रेस आणि एका जागेवर अपक्ष निवडून आला होता. भाजपला बसलेल्या धक्याची तीव्रता पाहायची झाल्यास तत्कालिन मुख्यमंत्री रघुवर दास यांनाही जमशेटपूर मतदारसंघात पराभवाची चव चाखावी लागली होती. घराणेशाहीच्या मुद्यावरून हेमंत यांना घेरणार - चंपाई यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षाला झारखंडमध्ये एक सक्षम आदिवासी चेहरा मिळाला आहे. भाजपकडून आतापर्यंत हेमंत सोरेन आणि झामुमोवर घराणेशाहीच्या मुद्यावरुन टीकास्त्र सोडले जात होते आणि चंपाई सोरेन यांच्या बंडांनंतर भाजपच्या टीकेला आणखीच धार येऊ शकते. चंपाई सोरेन यांना मुख्यमंत्रिपदावरून हटविल्यानतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी यांनी चंपाई यांच्या नाराजीत भर घालणारे विधान केले. आदिवासी समुदायातील व्यक्ती असला तरी तो सोरेन कुटुंबातील नसेल तर झामुमो पक्ष त्यास स्वीकारणार नाही, असे वक्तव्य करून मरांडी यांनी बंडाला हवा दिली. चंपाई यांच्या बंडाने झामुमोला घेरण्यासाठी भाजपला एक मोठा मुद्दा मिळाला. आता हाच मुद्दा प्रचारात आणि अन्य ठिकाणी देखील भाजपकडून वेळोवेळी मांडला जाईल.झामुमो नेत्यांच्या दाव्यात दम नाही - चंपाई सोरेन यांच्या भाजपा प्रवेशाने झामुमोसमोरील राजकीय अडचणीत वाढ झाली आहे.हेमंत सोरेन यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होत असून आता घराणेशाहीच्या मुद्यावर देखील त्यांना घेरले जात आहे. जमीन गैरव्यवहारप्रकरणी त्यांना अलिकडेच तुरुंगात जावे लागले होते. अशावेळी स्वच्छ प्रतिमेचे चंपाई सोरेन यांनी विरोधी गटात जाणे झामुमोला मोठा राजकीय धक्का देणारे आहे. अर्थात चंपाई यांच्या बंडखोरींने राजकीय नुकसान होणार नसल्याचा दावा झामुमोच्या नेत्यांकडून केला जात आहे. परंतु त्यांची बंडखोरी ही आदिवासी मतांसह विधानसभेच्या जागांवरही धक्का देणारी सिद्ध होऊ शकते. झारखंडमधील विधानसभेचे गणीत - झारखंड विधानसभेचे गणीत पाहिले तर विधानसभेत नियुक्त प्रतिनिधींसह एकुण आमदारांची संख्या ८२ आहे आणि त्यात निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या ८१ आहे. पैकी चार आमदार खासदार झाले आहेत तर झामुमोच्या आमदार सीता सोरेन यांनी मागच्या दिवसात सदस्यत्वाचा राजीमाना दिला. या कारणांमुळे झारखंड विधानसभेत आमदारांची संख्या ७७ झाली आहे. आता चंपाई सोरेन यांच्यामागोमाग आणखी सहा आमदार भाजपमध्ये जात असतील तर हेमंत सोरेन यांना पाठिंबा देणाऱ्या आमदारांची संख्या ४५ वरून ३८ होईल. झारखंडच्या ७७ सदस्यीय विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकण्यासाठी ३९ आमदारांचे पाठबळ असणे गरजेचे आहे. अशावेळी हेमंत सोरेन सरकारसमोर राजकीय संकट उभे राहू शकते. वास्तविक सात आमदारांचे सदस्यत्व रद्द केल्यास विधानसभेची संख्या ७० राहिल. अशावेळी सरकार वाचविण्यासाठी ३६ आमदारांची संख्या गरजेचे आहे आणि हे संख्याबळ हेमंत सोरेन यांच्याकडे आहे.झारखंडच्या विधानसभा निवडणुकीत झामुमोला मिळालेल्या विजयात चंपाई सोरेन यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. कोल्हान येथे झामुमोचा गड करण्यास चंपाई सोरेन यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. परंतु आता त्यांच्या वेगळ्या भूमिकेने पक्षाला झटका बसू शकतो. या कारणामुळेच भाजपला कोल्हान भागात आशेचे किरण दिसत आहेत. चंपाई यांनी भाजपमध्ये प्रवेश केला तर भाजपला नक्कीच यश मिळेल, परंतु त्यांनी वेगळी चूल मांडली असती तरी झामुमोला बसणाऱ्या फटक्यातूनही भाजपला फायदा होईल. भाजप नेत्यांच्या दाव्यानुसार, चंपाई यांनी झामुमोला सोडल्याने भाजपला या भागात आता फारशी अडचण जाणवणार नाही. मागील लोकसभा निवडणुकीच्या काळात भाजपला आदिवासी मतदारसंघात मोठा धक्का बसला होता. राज्यात अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेल्या सर्व जागांवर भाजपा पराभूत झाला होता. त्यामुळे भाजपच्या जागांची संख्या ११ वरून आठवर आली. या कारणामुळेच विधानसभा निवडणुकीच्या अगोदर भाजप आदिवासी समीकरण साधण्याचा प्रयत्न करत आहे. ■

**विद्येची आणि कलेची देवता असणारा श्रीगणेश म्हणजे जननायक, गणनायक. गणेशोत्सव म्हणजे 'आनंदाचे डोही आनंद तरंग.' केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात आणि जगातील काही भागात गणेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा होतो. महाराष्ट्रात अष्टविनायकाची मोठी परंपरा आहे आणि गाणपत्य संप्रदाय हा स्वतंत्र संप्रदाय म्हणून संपूर्ण भारतात मान्यता पावलेला आहे. हाराष्ट्रातील महानुभाव संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या संप्रदायांनी देखील श्री गणेशाची महत्त्व अधोरेखित केले आहे. वेदव्यासांना महाभारताची ऊर्जा साक्षात भगवान गणेशाने दिली आहे.**

# विठ्ठल गणपती दुजा नाही...

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे

विद्येची आणि कलेची देवता असणारा श्रीगणेश म्हणजे जननायक, गणनायक. गणेशोत्सव म्हणजे 'आनंदाचे डोही आनंद तरंग.' केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात आणि जगातील काही भागात गणेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा होतो. महाराष्ट्रात अष्टविनायकाची मोठी परंपरा आहे आणि गाणपत्य संप्रदाय हा स्वतंत्र संप्रदाय म्हणून संपूर्ण भारतात मान्यता पावलेला आहे. महाराष्ट्रातील महानुभाव संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या संप्रदायांनी देखील श्री गणेशाची महत्त्व अधोरेखित केले आहे. वेदव्यासांना महाभारताची ऊर्जा साक्षात भगवान गणेशाने दिली आहे.

वारकरी संप्रदायात गणेशाचे महत्त्व सर्व संतांनी अधोरेखित केले असून वारकरी संप्रदायातील संकीर्तन प्रकार कीर्तन ,लळित, भजन भारुड या प्रकारांनी भगवान गणेशाला प्रारंभीच वंदनीय मानले आहे त्यामुळे वारकरी संप्रदायातील भगवान गणेशाचे संकीर्तन हा चिंतनाचा विषय झाला आहे. ''कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरी रूप ।। कीर्तनाने देह हरी रूप होतो असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. कीर्तन हा नवविधा भक्तीतील महत्त्वाचा प्रकार आहे. संतांच्या अभंगावर कीर्तनामध्ये निरूपण होते. गणेशोत्सवात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या रंजनपर कार्यक्रमांच्या ऐवजी कीर्तन महोत्सव आयोजित केले जातात आणि या कीर्तन महोत्सवांमध्ये गणेशाच्या जन्माची कथा सादर केली जाते तसेच त्याने सिंदूर राक्षसाच्या केलेल्या वधाची कथा सादर केली जाते. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांच्यासह अनेक संतांनी आपल्या अभंग रचनांच्या पूर्वी भगवान गणेशाचा धावा केलेला आहे ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी **'ओम नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।।** अशा मंगलाचरणाने सुरुवात केलेली आहे संत नामदेव महाराजांनी देखील मंगलाचरण मध्ये गणेशाचे वंदन केले आहे हे वंदन असे-

**प्रथम नमन करू गणनाथा।**
**उमा शंकराचिया सुता।**
**चरणावरी ठेवूनि माथा।**
**साष्टांग आता दंडवत।।१।।**
**दुसरी वंदू सारजा।**
**जे चतुराननाची आत्मजा।**
**वाक सिद्धी पाविजे सहजा।**
**तिच्या चरण वोजा दंडवत।।२।।**

संत नामदेव महाराज गणेशाला वंदन करतात ते असे

**प्रथम नमूं गजवदनु।**
**गौरी हाराचा नंदनु।**
**सकळ सुरवारांचा वंदनु।**
**मूषक वाहनू नमियेला।।१।।**
**त्रिपुरा वधी गणाधिपति।**
**हरे पूजिला भावे भक्ती।**
**एके बाणे त्रिपुर पाडिला क्षिती।**
**ते पशुपति संतोषला।।२।।**

अष्ट लोकपालांनी देखील गणेशाची पूजा केली असे संत नामदेवराय या अभंगात पुढे म्हणतात एकूणच रिद्धी सिद्धी सारजा आणि गणेशाचे नर्तन याचे वर्णन ठाई ठाई संतांच्या अभंगात येते.

वारकरी संतांच्या अभंगांमध्ये गणपती रिद्धी सिद्धी सरस्वती यांची वर्णने हमखास येतात. एवढेच नव्हे तर कीर्तन आणि सदृश्य सोंगी भारुड सोंगी भजन लळित या वारकरी संप्रदायाच्या संकीर्तन प्रकारांमध्ये वर्णन आणि प्रत्यक्ष दर्शन या देवतांच्या सोंगाच्या रूपाने होते. पश्चिम महाराष्ट्र मराठवाडा या भागात सोंगी भारुडे सोंगी भजने आणि लळिते प्रसिद्ध आहेत. त्यातील गणेशाचे दर्शन मोठे मनमोहक असते.

**लळित :** लळीत हे सांगतेचे भक्तिनाट्य आहे. कीर्तन ज्या संप्रदायाचे, त्या संप्रदायाच्या प्रभावाखाली लळीत सादर होत असे. आजही ते त्याच पद्धतीने सादर होते. वारकरी संप्रदायाच्या प्रभावाखाली असणाऱ्या लळिताच्या प्रारंभी 'रूप पाहता लोचनी' हा ध्यानाचा अभंग, तसेच 'सुंदर ते ध्यान। उभे विटेवरी' हा रूपाचा अभंग म्हटला जातो. 'विठ्ठल विठ्ठल' अशा गजरात सोंगाचे आगमन आणि निर्गमन होत राहते. लळिताचे पहिले सोंग निघण्याची तयारी होते, तेव्हा मंगलचरण आणि प्रसादाचा अभंग म्हटला जातो.

**देवा प्रसाद देई झडकरी।। सद्गुरु देवा प्रसाद देई।। ध्रु. ।। वासुदेव दंडीगाणा।। प्रसाद मागू आले दान।। आणिक आले कोण कोणा।। नावे त्यांची परसावी।।१ ।। ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वाणी।। मागू आल्या चारी खाणी।।२।। गोंधळ, डफकर, भैरव, जोगी।। बाळसंतोष आणि वैरागी ।। फकीर डाकुलता तो योगी।। कानफाटा आला तो ।।३।। आंधळा, पांगुळ, बहिरा, मुका।। कैके, सबरी, मुंडा देखा।। भाट किन्नर ज्योतिष ऐका।। तिष्ठताती प्रसादा।। ।।४।। सारे मंडपी आले असे।। राव विनोदे बोलतसे।। महार जोहार करीतसे।। प्रसाद द्या द्या म्हणउनी ।।स. ।।५।। ऐसे अपार भक्त आले।। प्रसाद देउनी तृप्त केले।। श्रमदासाची पाऊले ।। यदुवीर दासे वंदिली।। ६।।**

प्रसादाचा हा अभंग संपल्यानंतर 'रात्र थोडी सांगे फार' या उक्तीप्रमाणे लळितात रात्रभर साँगे सुरू राहतात आणि प्रत्येक सोगाचा प्रहर, काळ ठरलेला असतो.

**गणराया लवकर येई। भेटी सकळांशी देई। नाचत आले हो गणपती। पायी घागुऱ्या वाजती ।।**

हा संत तुकाराम महाराजांचा अभंग भजनी मंडळी सुरू करतात आणि गणपतीचे पहिले सोंग येते. त्यानंतर ऋद्धी- सिद्धी, सरस्वती ही सोंगे येतात. सूत्रधार, वनमाळी ही सोंगे येतात, गणपती, सरस्वती यांची महती सुप्रचार सांगत असतो व वनमाळी हे पात्र गणपतीला 'शेंबूडपती', तसेच सरस्वतीला 'पिसं लावलेली कोंबडी' असे संबोधते. वनमाळी हे पात्र दशावतारातील संकासुर अथवा भागवत- मेळा-यक्षगानातील विदूषक या पात्रासारखे असते. निरर्थक ग्राम्य बडबड करणारे हे पात्र वरवर पाहता केवळ विनोदनिर्मिती करणारे पात्र असे वाटत असले, तरी ते भावबळे देव बद्ध करणाऱ्या, नामसंकीर्तन भक्ती साधणाऱ्या भाविक लौकिक पातळीवरील एक सश्रद्ध पात्र अथवा सोंग असते.

**भारूडातील गण :** भारुड या भक्तीनाट्याचा प्रारंभ मुळात गणेश स्तवनाने होतो. 'विठ्ठल, गणपती दुजानाही' ही संतांची भावना भक्तांमध्येही अवतरलेली असते. लालबाग ,परळ ,माझगाव, भायखळा या परिसरांमध्ये एके काळी भारुडी भजन मंडळी होती. काळभैरव प्रासादिक भारुड भजन मंडळ, संत ज्ञानेश्वर प्रासादिक भारुड भजन मंडळ अशी मंडळे प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर तालुक्यातील भारुड मंडळे भारुड सादर करायचे. त्यात गणपती, रिद्धी - सिद्धी यांची सोंगे हमखास असायची.

भारुडातील गण असा :

**तुज नमो नमो ओमकार स्वरूपा**
**ओमकार स्वरूपा**
**नमो नमो ओमकार स्वरूपा**
**ओमकार स्वरूपा सद्गुरू समर्था**
**अनाथांच्या नाथा तुज नमो**

मुख्य गायक गळ्यात टाळ अडकवून उंच उड्या घेत ओमकाराचे असे संकीर्तन करतो , तेव्हा गणपती रिद्धी ,सिद्धी ही पात्रे भारुडात येतात. दशावतार ,भारुड ,लळीत ही तिन्ही भक्तीनाट्ये. त्यामुळे या भक्तीनाट्यांमध्ये गणपती ,रिद्धी सिद्धीचे सोंग हमखास असते.

**दशावतार :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात सादर होणाऱ्या दशावतामध्ये पूर्वरंगात गणपती आगमन झाल्यावर सूत्रधार आणि भटजी यांच्यात संवाद होतो तो असा..

**सूत्रधार : हे गणेशा, गौरी गणेशा, तू जगदीशा सकल कलांचा तू निर्माता, तू निर्माता भक्तजनांचा तू सुखदाता, तू सुखदाता हे गणेशा, गौरी गणेशा, तू जगदीशा।।ध्रु.।।**

**(गणपतीचे आगमन गीत)**

**पतिया तुझे नाम स्मरणे हो।गणपतिया तुझे नाम स्मरणे हो।** (बाकड्यावरच एक गडी चादरीचा पडदा आडवा धरतो.)

**सूत्रधार : (गणपती व ऋद्धी-सिद्धी त्यामागे येऊन उभे राहतात.)गणपतिया तुझे नामस्मरण हो।हे चिताम् ता थैया ता--।**(चादरीचा पडदा बाजूला होतो. गणपती व दासी नृत्य करतात.)

**सूत्रधार : मूषकवाहना गजानना थैया।सिंदूरवदना गजानना थैया।हे चिताम् ता थैया ता--।**

भटजी : (प्रवेशून) वरया वरया वर या वर या हो।

सूत्रधार : अहो भटजी महाराज, वर या वर या ह्याचा भावार्थ काय हो?

भटजी : अहो, ही समोर बसलेली जनता दु:खरूपी भवसागरात बुडते आहे. त्यांनी तरून यावे, म्हणून मी वर या वर या असे म्हणालो.

सूत्रधार : अहो भटजी महाराज, आज तुम्ही इथे कसे?

**भटजी :** त्याचे असे झाले, मी चाललो होतो दक्षिणेकडून उत्तरेकडे... वाटेत ऐकले की प्रत्यक्ष श्रीगणेशाचे आगमन इथे झालेले आहे. तेव्हा म्हटले, अनायासे संधी चालून आलेली आहे, दक्षिणा मिळेल म्हणून आलो. ■

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**शनिवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२४**

भाद्रपद शु.४, बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा **ऋतू** : शुभ दिवस सायंकाळी ५.३६ नंतर, श्रीगणेश चतुर्थी पार्थिव गणपती पूजन, चंद्रदर्शन निषेध(चंद्रास्त रात्रौ ८.४९), राजे उमाजी नाईक जयंती, **नक्षत्र** : चित्रा, योग : ब्रह्मा, करण : बव, **सूर्योदय :** स.०६.०१ **सूर्यास्त :** सायं.०६.२२ वा., **राहू काळ :** सकाळी : ९:०० ते १०:३०

### दिनविशेष

*१७०७ : दोन मोठ्या ताऱ्यांच्या टकरीतून आपला सूर्य आणि त्याची ग्रहमाला निर्माण झाली हा सिद्धांत मांडणारे फ्रेंच तत्त्वज्ञ काऊंट बफॉ यांचा जन्म. *१८२४ : पुरातत्व विद्या व वैद्यक यातील अग्रगण्य कर्ते डॉ. भाऊ लाड यांचा जन्म. *१८८९ : शरदचंद्र बोस जन्मदिन. *१८२२ : ब्राझीलने पोर्तुगालचे वर्चस्व झुगारून स्वातंत्र्याची घोषणा केली. *१८२४ : संस्कृतचे गाढे पंडित, आधुनिक मुंबई शहराचा पाया घालणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी एक आणि कुष्ठरोगावर औषधोपचार करणारे वैद्यकीय तत्त्वज्ञ डॉ. भाऊ दाजी लाड यांचा जन्म. *१८४९ : हिंदुस्थानी परंपरेतील सुप्रसिद्ध गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचा जन्म. *१९०६ : बँक ऑफ इंडियाची स्थापना. ही भारतातील पहिली स्वदेशी बँक. *१९३१ : दुसरी गोलमेज परिषद सुरू. महात्मा गांधी भारतीय प्रतिनिधी म्हणून उपस्थित. *१९४५ : शांघाय शहरातून जपानी सैन्याची माघार. यानंतर दोन दिवसांनी चीनमधील झटापटी संपल्या.

### राशीभविष्य

***मेष** : मानसिक ताणतणाव शक्य. ***वृषभ** : पूर्वनियोजित प्रवासामध्ये अडथळे. ***मिथुन** : प्रतिष्ठितांचे सहकार्य लाभेल. ***कर्क** : कुटुंबात सुसंवाद राहील. ***सिंह** : भावंडांशी भांडणतंटे होतील. ***कन्या** : आपल्या मतांचा आदर होईल. ***तुळ** : कर्तृत्त्वाला झळाळी लाभेल. ***वृश्चिक** : अनावश्यक खर्च उद्भवतील. ***धनु** : व्यवसायातून चांगली अर्थप्राप्ती. ***मकर** : इच्छा कृतीत आल्यामुळे समाधान. ***कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. ***मीन** : आत्मविश्वास वाढेल.

### मेसेज आया

शब्द अंतरीचे असतात, पण दोष जिभेला
मिळतो, मन स्वत:चे असते,
पण झुरावे दुसऱ्यासाठी लागते,
ठेच पायाला लागते,
पण वेदना मनाला होतात,
दु:ख हृदयात होते,
पण रडावे डोळ्यांना लागते.



### व्यक्तीविशेष

## डेस्मंड टूटू

डेस्मंड एमपिलो टूटू हे दक्षिण आफ्रिकेतील ख्रिस्ती धर्मगुरू आहेत. १९८० च्या दशकात वर्णभेदाच्या लढ्यातील त्यांच्या सक्रिय सहभागामुळे त्यांचे नाव जगभरात प्रसिध्द झाले. १९८६ मध्ये ते केप टाऊनचे अँग्लिकन आर्चबिशप आणि चर्च ऑफ द प्रॉव्हिन्स ऑफ सदर्न आफ्रिका (आताचे अँग्लिकन चर्च ऑफ सदर्न आफ्रिका) चे प्रायमेट म्हणून निवडून आले. या पदावर निवडून आलेले ते पहिले कृष्णवर्णिय दक्षिण आफ्रिकी आर्च बिशप. वर्णभेदाच्या विरोधात ते सातत्याने उभे राहिले. टूटू यांनी एड्सविरोधातही जनजागरण मोहिमा राबवल्या. एड्स, गरिबी आणि वंशवाद हे त्यांच्या तिटकाऱ्याचे विषय आहेत.१९८४ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला. त्याचवर्षी त्यांना मानवतावादी सेवेसाठी अल्बर्ट श्विट्झर पुरस्कार आणि २००७ मध्ये गांधी शांती पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या भाषणांची अनेक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. ७ ऑक्टोंबर १९३१ रोजी ट्रान्सवाल येथे टूटूंचा जन्म झाला. तत्वज्ञान हा त्यांचा आवडीचा विषय होतो. इंग्लंडमधील किंग्ज कॉलेजमूधन त्यांनी या विषयात मार्स्टर्स डिग्री घेतली. इंग्लंडमध्ये शिकत असतानाच त्यांनी चर्चच्या सेवेत स्वत:ताला झोकून दिले.

### बोधकथा

## लांडग्याचे नशीब

एकदा एक गाडीवान आपल्या गाडीतून मासे घेऊन चालला होता. जंगलातून भक्ष्य शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या कोल्ह्याने ते पाहिले. मासे पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. मासे मिळवायाचे कसे याचा विचार तो करू लागला. त्याला एक यक्ती सुचली. गाडीवान आपल्याच नादात गाडी चालवत पुढे निघाला होता. वाटेत त्याला हा कोल्हा मरून पडलेला दिसला. त्याने विचार केला, या कोल्ह्याचे कातडे विकून चार पैसे तरी मिळतील. त्याने कोल्ह्याच्या शेपटीला धरले आणि मागे टाकले. कोल्ह्याने गाडीवानाचे लक्ष नाही, असे पाहून मनसोक्त मासे खाल्ले आणि गाडीतून उडी मारून निघून गेला. त्याला गाडीतून उडी मारताना एका लांडग्याने पाहिले. लांडग्याने त्याला विचारले की तो गाडीत काय करत होता. कोल्ह्याने काय ते सांगितले मग लांडगाही मेल्याचे सोंग घेऊन गाडीपुढे पडला. गाडीवानाला खूप आनंद झाला. त्याला वाटले, चला लांडग्याचेही कातडे विकून आपलला आणखी पैसे मिळती, तो लांडग्याला उचलायला गेला तर तो खूप जड लपवाअला ,गाऊीवनाजा लांडगा उचलता येइना म्हून म तो खूप जउ वाला गाडीवनाला लांडगा उचलता येइना म्ळणून मग तयाने एक जपोत आणले त्यात लांडग्याला घातले आणि ते पोते आपल्या गाडीला घट्ट बांधले आणि गाडीबरोबर फरफटत नेले. **तात्पर्य: एका व्यक्तिसाठी फायदेशीर ठरलेली गोष्ट दुसऱ्यासाठीही तशीच ठरेल असे नाही.**

### भूगोल

## अंकल सॅम

७ सप्टेंबर १८१३ रोजी युनायटेड स्टेटस् (अमेरिका) ला अंकल सॅम हे टोपनराव मिळाले. त्याची कथा मोठी मजेशीर आहे. सॅम्युअल विल्सन नावाचा एक मटणाचा व्यापारी न्यूयॉर्कमधील टोरी येथे राहत असे. १८१२ च्या युध्दात तो अमेरिकेच्या लष्कराला मटणाची बॅरल्स पुरवत असे. या बॅरल्सवर त्याने युनायटेड स्टेटससाठी यू.एस. असा शिक्का मारला होता. पण सैनिकांनी या यू.एस.चे केले अंकल सॅम. एका स्थानिक वृत्तपत्राने या घटनेबद्दल लिहिले आणि अंकल सॅम ही संज्ञा अमेरिकेच्या सरकारसाठीचे टोपणनाव झपाट्याने सगळ्यांनी स्वीकारले. नंतर १८६० आणि १८७० च्या दशकात राजकीय व्यंगचित्रकार थॉमस नॅस्ट याने या अंकल सॅमला व्यक्तीरूप दिले. पांढरी दाढी आणि चांदण्या आणि पट्टे असलेला सूट या अवतारात त्याने अंकल सॅम रंगवला. आजही अंकल सॅमला याच रूपात बघितले जाते. पण अंकल सॅमची सर्वात प्रसिध्द प्रतिमा तयार केली ती जेम्य मॉटगोमेरी फ्लॅग या चित्रकाराने. खऱ्या सॅम्युअलचे वयाच्या ८८ व्या वर्षी १८५४ मध्ये निधन झाले. १९६१ मध्ये अमेरिकन कॉंग्रेसने सॅम्युअल विल्सनला अंकल सॅम या अमेरिकेच्या राष्ट्रीय प्रतिकाचा जन्मदाता म्हणून मान्यता दिली.

### नवं संशोधन

## रहस्यमय 'फ्रँकेस्टीन' आकाशगंगेचा शोध

संशोधकांनी एका दुर्लभ आणि रहस्यमय अशा आकाशगंगेचा शोध लावला आहे. पृथ्वीपासून सुमारे २५ कोटी प्रकाशवर्ष अंतरावर असलेल्या या आकाशगंगेला 'फ्रँकेस्टीन' म्हटले जाते. ही आकाशगंगा अन्य आकाशगंगांच्या भागांपासून बनलेली असावी, असे संशोधकांना वाटते. सुरुवातीला या आकाशगंगेचे फारसे महत्त्व जाणवले नव्हते. ती छोटी, जुनी आणि सर्वसामान्य आकाशगंगा आहे असेच म्हटले जात होते. मात्र, नासाच्या अद्ययावत दुर्बिणी व वेधशाळांच्या मदतीने तिचे सखोल संशोधन केल्यावर असे दिसून आले की ही आकाशगंगा अनुमानापेक्षा दहा पटीने अधिक मोठी आहे. ती अन्य आकाशगंगांपेक्षा वेगळीही असल्याचे दिसले. विशेष म्हणजे तिचा अंतर्गत भाग हा बाह्य भागाच्या तुलनेत नवा आहे. तो शिल्लक तुकड्यांनी बनल्यासारखा दिसतो. कार्नेजी इन्स्टिट्यूशन फॉर सायन्सच्या मार्क सॅबर्त यांनी याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले, ही आकाशगंगा ब्रह्मांडाच्या 'गर्दी'च्या ठिकाणांपासून वेगळी आहे आणि म्हणूनच बचावलेली आहे. ती इतकी नाजूक आहे की अन्य अवकाशीय ग्रहांच्या क्षुल्लक धडकेनेही ती तुटू शकते. सॅबर्त आणि पेनसिल्वानिया युनिव्हर्सिटीतील विद्यार्थी ली हेजन यांनी ताऱ्यांच्या निर्मितीची प्रक्रिया शोधत असताना अपघातानेच या आकाशगंगेला शोधले होते.

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४२९**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2 |
| | 2 | | |
| | 3 | | 4 |
| | 1 | 2 | |

**क्रमांक ४२८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 2 | 3 | 1 | 4 |


### हास्यविनोद

राजकीय नेत्यांना घेऊन जाणारी बस एका झाडावर आदळली. शेताचा मालक धावत आला. त्याने सर्व काही पाहिले आणि एक मोठा खड्डा खणून त्याने सगळ्या नेत्यांना त्यात पुरले. काही दिवसांनी पोलिस तपासासाठी आले. पोलिसांनी विचारले, सगळे नेते ठार झाले होते का? शेतकरी म्हणाला, तसेच काही नाही, काही नेते म्हणत होते की ते मेलेले नाहीत. पण तुम्हाला तर माहितच आहे की नेते किती खोटं बोलतात ते!

### महिलायन

## स्मार्ट टिप्स्

चहा बनवल्यानंतर उकळलेली पावडर धुवून गुलाबाच्या झाडाला टाकावी. गुलाबाच्या झाडासाठी ही पावडर खताचे काम करते. लिंबाच्या सालांमध्ये थोडासा सोडा मिसळून तांब्याची भांडी साफ करावीत. भांडी सहजपणे चमकू लागतात. पपईची साले सुकवून वाटू घ्यावीत. या पावडरीचा वापर मटण शिजवताना करावा. यामुळे भोजन स्वादिष्ट बनते. भटुरे बनवताना मैद्यात थोडा रवा मिसळून बनवावे यामुळे भटुरे लाटणे सोपे जाते आणि त्यांना एकप्रकारचा स्वादही येतो. कुठलेही मसाले तेलात परतताना मंद आचेवर परतावेत. यामुळे पदार्थाचा स्वाद वाढतो. फणसातील बिया फेकू नये. त्या साठवत रहाव्यात. पाण्याने चांगल्या प्रकारे धुवून, उकळून सोलून घ्याव्यात. या बिया रसेदार मसाल्याच्या भाज्यांमध्ये वापराव्यात किंवा बेसनपीठात मिसळून त्याची भजी बनवावी. या बिया बलवर्धक तसेच जुलाब रोखणाऱ्या असतात. लिंबू आणि संत्र्याची साले फेकू नयेत. उन्हात सुकवून त्याचे चुर्ण बनवावे. या चुर्णाच्या पाण्याने गुळण्या केल्यास तोंड स्वच्छ होते.



पनीर बनवल्यानंतर जे पाणी उरते ते हलके आणि शीघ्र पचन करणारे असते. मुलांना जुलाब होत असल्यास हे पाणी द्यावे. या व्यतिरिक्त या पाण्याने कणीक भिजवले जाऊ शकते किंवा वरणभातात देखील हे पाणी टाकता येऊ शकते. (पूर्वार्ध)

### घरगुती औषध

## बडीशेप

अत्यंत रूचकर औषध म्हणून याचा वापर सहज केला जातो. तोंडाला चव आणणे, पचनविकार सुधारणे, पोटातील वायू कमी करणे, तसेच पोट फुगणे हा त्रास घालवणे हे बडीशेपचे मुख्य कार्य आहे. जेवणानंतर अर्धा चमचा बडीशेप चाऊन खाण्याने पचनाचे सर्व विकार कमी होतात. बडीशेपला एक स्वाद असतो. त्यामुळे तोंडाची दुर्गंधी घालण्याचे कामही बडीशेप करते. तापामध्ये तोंडाला कोरड पडते. अंगाची लाहीलाही होते. अशावेळी बडीशेपचे खडीसाखर घालून उकळलेले पाणी थोडे थोडे सारखे दिल्यास चांगला उपयोग होतो. लहान मुलांना हे पाणी दिल्यास त्यांची पचनशक्ती सुधारते या बरोबरच वारंवार पाणी पिण्याची सवयही त्यांना लागते.



'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## ३६ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये वैविध्यपूर्ण कार्यक्रम

# बालगंधर्व रंगमंदिरात सांस्कृतिक नजराणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये बालगंधर्व रंगमंदिर येथे दि. ८ ते १६ सप्टेंबर या काळात विविध सांस्कृतिक उपक्रमांची मालिका सजणार आहे. यामध्ये केरळ महोत्सव, उगवते तारे व इंद्रधनु, भारत मेरा रंगरंगीला कार्यक्रम, मिसेस पुणे फेस्टिव्हल स्पर्धा, मराठी कविसंमेलन, ग.दि.मा. व सुधीर फडकेंची गाणी, ऑर्केस्ट्रा, अभिनेत्री वैजयंतीमाला यांच्यावर चित्रित गाणी व नृत्य, महिलांची नृत्य स्पर्धा, व्हाइस ऑफ पुणे फेस्टिव्हल आणि पुणे फेस्टिव्हल करंडक स्पर्धा, पुण्यातील ९ शाळांमधील विद्यार्थ्यांचे नृत्य आदींसोबतच प्रख्यात पार्श्वगायक मोहम्मद रफी, संगीतकार मदनमोहन, अभिनेते राज कपूर व गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'लिजंट्स ऑफ बॉलीवूड' हा गीत व नृत्य कार्यक्रम, भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अभंग, गण-गवळण, नाट्यसंगीत, गझल, भावगीत व सिनेसंगीत आणि नृत्य यांचा 'अविष्कार भारती' कार्यक्रम, रोटरी क्लबच्या सदस्यांनी सादर केलेला 'रोटरीचे इंद्रधनु' कार्यक्रम आणि सदाबहार लावणी अशा अनेक मनोहारी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य आहेत, अशी माहिती पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक अ‍ॅड. अभय छाजेड आणि बालगंधर्व सांस्कृतिक कार्यक्रमप्रमुख मोहन टिल्लू यांनी दिली. माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे, महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागाच्या पर्यटन संचलनालयाच्या पुणे विभागाच्या उपसंचालिका शमा पवार व सर्व कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजक उपस्थित होते.

### वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची पुणेकर रसिकांना पर्वणी

पुणे फेस्टिव्हल ०७–१७ सप्टेंबर २०२४ महाराष्ट्र–भारत

- बालगंधर्व कलादालनात पेंटिंग स्पर्धा व प्रदर्शन आणि पुण्याच्या पर्यटनाबाबत विशेष परिसंवाद
- महाराष्ट्र साहित्य परिषदमध्ये नारदीय कीर्तन महोत्सव आणि केसरी वाड्यातील लोकमान्य सभागृहात ५० फूट x ३ फूट कॅन्व्हासवर महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची चितारलेली पेंटिंग्ज हे देखील आकर्षण
- केरळवासीयांच्या 'पुणे मल्याळी फेडरेशन'तर्फे केरळ महोत्सव- (रविवार, ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)
- उगवते तारे व इंद्रधनु - (सोमवार, ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता 'उगवते तारे' व सायंकाळी ५.३० वाजता 'इंद्रधनु' बालगंधर्व रंगमंदिर येथे सादर होतील)
- भारतातील विविध राज्यांमधील संस्कृतींचे विलोभनीय दर्शन, गीत व नृत्यातून साकारणारा 'भारत मेरा रंगरंगीला' हा कार्यक्रम सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होईल.
- सदाबहार मराठी कविसंमेलन - (गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)
- बाबूजी-गदिमांची' - ( सोमवार, १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर)
- तुझ्यात जीव रंगला - (सोमवार १६ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर)
- विवाहित महिलांचे व्यक्तिमत्त्व आणि गुण यांवर आधारित 'मिसेस पुणे फेस्टिव्हल स्पर्धा' शनिवार, दि. १४ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होत आहे.
- महिलांची नृत्य स्पर्धा - (रविवार, दि. १५ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर )
- प्रख्यात अभिनेत्री पद्मविभूषण वैजयंतीमाला यांच्यावर चित्रित हिंदी चित्रपट गीते व नृत्य यांचा 'आम्रपाली' कार्यक्रम रविवार, दि. १५ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होईल.
- लिजंट्स ऑफ बॉलीवूड – शनिवार, दि. १४ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजता
- ऑफ पुणे फेस्टिव्हल व करंडक – रविवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सायं. ५.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर
- रॉकिंग 90s - १९९० ते १९९९ या काळातील गाजलेल्या चित्रपट गीतांचा हा कार्यक्रम - (गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)
- भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या विद्यार्थ्यांतर्फे अविष्कार भारती - ( शनिवार १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)
- रोटरीचे इंद्रधनु - ( सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)
- पुण्यातील विविध ९ शाळांमधील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सादर केलेले समूह नृत्य – (शुक्रवार, १३ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर)

## गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या हस्ते श्रीमंत भाऊसाहेब रंगारी बाप्पाची प्राणप्रतिष्ठा...

# वाजत-गाजत बाप्पाची मिरवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टच्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठा प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या हस्ते होणार शनिवारी (दि. ७) दुपारी साडेबारा वाजता होणार आहे., त्यापूर्वी ढोल ताशांच्या गजरात आणि जंगी मिरवणूक देखील निघणार आहे.

मंडळाचे उत्सव प्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, गणेश चतुर्थीला सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी बाप्पाची आरती होईल. त्यानंतर मिरवणुकीला सुरवात होईल. सुरवातिला लाठीकाठी मर्दानी खेळ व शंखनाद होईल. त्यानंतर सात पथकांकडून श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनासमोर ढोल-ताशांची सलामी दिली जाणार आहे. शिवमुद्रा, वाद्यवृंद, मानवंदना, श्री, नु म वी, कलावंत, श्रीराम ही सात ढोल ताशा पथके बाप्पाच्या मिरवणुकीत सहभागी असणार आहेत. या सर्व पथकांच्या वादन मिरवणुकीने श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टच्या बाप्पाचे वाजत गाजत आगमन होणार आहे.



> दरवर्षीप्रमाणे यावर्षी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाची वाजत-गाजत मिरवणुकीनंतर प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या प्राणप्रतिष्ठा होणार आहे. तरी सर्व गणेश भक्तांनी या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहावे ही विनंती."
> — **पुनीत बालन,** उत्सव प्रमुख व विश्वस्त श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट

विशेष म्हणजे १३२ वर्षानंतर प्रथमच यावर्षी बाप्पाच्या रथाला बैलजोडी न लावता कार्यकर्ते हा रथ ओढणार आहेत. दुपारी साडेबारा वाजताच्या मुहूर्तावर प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या हस्ते बाप्पाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील कार्यक्रम होतील असे पुनीत बालन यांनी सांगितले.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## येरवडा ते शिक्रापूर हा रस्ता सहापदरी करण्यास मान्यता

**पुणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सध्याच्या पुणे-शिरुर-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येरवडा ते शिरुर हा ५३ कि.मी. दरम्यान सहा पदरी उड्डाणपूल उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे.उड्डाणपूल उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत केले जाणार आहे. त्यास ७ हजार ५१५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

नगर रस्त्यांवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी येरवडा ते शिरुर हा रस्ता सहापदरी करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करावा' असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना मध्यंतरी दिले होते.नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर आहे. त्यामधील महापालिकेच्या हद्दीतील येरवडा ते खराडी पुणे महापालिकेच्या हद्दीत येतो. नगर रस्ता हा राज्य मार्ग असल्याने राज्य शासनाने पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या सिग्नल फ्री जुन्या पुणे-मुंबई रस्त्याच्या धर्तीवर हा रस्ता विकसित करण्यात यावा आणि त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत होती.

### मंत्रिमंडळाने मान्यता दिली

येरवडा ते शिक्रापूर हा रस्ता सहापदरी करण्याबरोबर कोणत्या ठिकाणी उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर करायचे, यासंबंधीचा आराखडा करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या होत्या. त्यानुसार यासाठीचा सविस्तर प्रस्ताव तयार करून मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला होता.



---

## गौरव कार्याचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** शिक्षक दिनानिमित्त ना. चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून पालिकेच्या शाळेतील शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

## शिक्षक दिनानिमित्त ना. चंद्रकांत पाटील यांनी जागवल्या शालेय आठवणी

# पालिका शाळेतील शिक्षकांचा गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माझी जडणघडण ही मुंबईतील मनपा शाळेत झाल्याने; मनपा शाळेतील शिक्षक अतिशय खडतर परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना ज्ञान दानाचे काम करतात. त्यामुळे त्याची जाणीव मला आहे, अशा शब्दांत ना. चंद्रकांत पाटील यांनी मनपा शाळेतील शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करत; आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.



> माझे आणि माझ्या बहिणींचे प्राथमिक शिक्षण हे मुंबईतील महापालिकेच्या शाळेत झाले. त्यामुळे आजही तो काळ आठवला की, सर्वात पहिला चेहरा समोर येतो तो शिक्षकांचा! कारण, अपुऱ्या सुविधा असूनही; त्यावर मात करत ते विद्यार्थ्यांना ज्ञान दानाचे पवित्र कार्य करायचे. त्यामुळे मनपा शाळेतील शिक्षकांचे महत्व आणि त्यांच्या मेहनतीची जाणीव आहे. कोथरूड मतदारसंघातील मनपा शाळेतील सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करु."
> — **ना. चंद्रकांत पाटील**

शिक्षक दिनानिमित्त ना. चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून पालिकेच्या शाळेतील शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजिका मा. नगरसेविका तथा शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा मंजुश्री खर्डेकर, भाजपा कोथरूड दक्षिण मंडल अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, माजी नगरसेविका हर्षाली माथवड, अ‍ॅड. मिताली सावळेकर, सरचिटणीस दिनेश माथवड आदी मान्यवर उपस्थित होते.

---

» Selected

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप'



**पुणे :** सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या सिंहगड वास्तुकला विद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष सध्या साजरे होत आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. गुरुवारी ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये माझे प्राचार्य व शिक्षकांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ मिलिंद तेलंग, माजी प्राध्यापक राजीव कुलकर्णी आणि काशीबाई नवले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर चव्हाण उपस्थित होते. तसेच विभाग प्रमुख डॉ. प्रियंवदा चितळे, प्रा. प्रीती धनवट, प्रा. कविता पाटील, प्रा. कल्पना हडप, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, तसेच पदव्युत्तर विभागांचे विभाग प्रमुख डॉ. प्रणोती लाड, प्रा. अंकुर पाटील आणि महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## दारू वाहतूक करणारा टेम्पो पकडला

**कोंढवा :** गुन्हे शाखेच्या दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाने कात्रज कोंढवा रस्त्यावर दारू वाहतूक करणारा टेम्पो पकडला. त्यातून पोलिसांनी एक लाख ५७ हजारांची दीड हजार लिटर गावठी दारू (४५ कॅन) जप्त केली. तर, चालकाला अटक केली आहे. शहर परिसरात छुप्या पद्धतीने बेकायदा सुरू असलेल्या दारू तस्करीचा पर्दाफाश केला. दरम्यान, मागील काही दिवसांपासून होणाऱ्या कारवायामुळे शहरात बेकायदा व्यावसायिक सक्रीय असल्याचे दिसून आले आहे. भगत गणेश प्रजापती (२४, उरूळी कांचन) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. गुन्हा दाखल करून त्याला कोंढवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## .. अन्यथा डीएसकेचे गुंतवणूकदार दाखवणार काळे झेंडे !

**पुणे :** डी एस कुलकर्णी यांच्या कंपन्यात ठेवी बुडलेल्या गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन झालेल्या चैतन्य सेवाभावी संस्था (असोसिएशन ऑफ डीएसके फ्रॉड व्हिक्टिम्स) ने हिंदू महासंघाच्या सहकार्याने मेळाव्याचे आयोजन केले होते. श्रमिक पत्रकार संघ सभागृह येथे हा मेळावा झाला. हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे, राष्ट्रवादी पक्ष (शरदचंद्र पवार) चे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना (उध्दव ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार, एकनाथ शिंदे गटाचे प्रवक्ते अभिजित बोराटे उपस्थित राहिले. त्यातून राजकीय पक्षांचा गुंतवणूकदारांना पाठिंबा मिळाला. पुढील आक्रमक आंदोलनाची दिशा जाहीर करण्यात आली. 'डीएसके प्रकरणात सर्व यंत्रणा कडून सर्वसामान्य व्यक्तींना गृहित धरले जात आहे. आपलेच पैसे मिळविण्यासाठी गुंतवणूकदारांना यातायात करावी लागते. राजकीय पक्षांनी गुंतवणूकदारांना न्याय देण्यासाठी हालचाली केल्या नाहीत तर गणेशोत्सवानंतर सर्व राजकिय पक्षांच्या कार्यक्रमांना काळे झेंडे घेऊन उपस्थित राहून गुंतवणूककार हा मुद्दा मांडतील.

---

## पोलिसांकडून कडक सूचना जारी

# शाळेतील कामगार, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणीचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील विशेषतः कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह शाळांचे व्हॅनचालक, रिक्षावाले काका, मदतनीस, स्वच्छता कामगारांची पडताळणी करून घेण्यासाठी शाळा सध्या प्रयत्नशील आहेत. बदलापूर येथे घडलेल्या घटनेनंतर विद्यार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर खडबडून जागे झालेल्या शिक्षण विभागांसह पोलिसांनीदेखील आता शाळेतील कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या चारित्र्य पडताळणी तत्काळ करण्याबाबतच्या सूचना शाळांना दिल्या आहेत.त्यामुळे कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कामगार आणि कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी शाळांची धावपळ सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, मागील आठवड्यात शहर पोलिस आयुक्तांनी शाळा, संस्थाचालक, मुख्याध्यापकांची बैठक घेतली. या बैठकीत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्याप्रमाणे नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच कंत्राटी पद्धतीने नियुक्त होणारे सुरक्षारक्षक, सफाई कामगार, मदतनीस, स्कूल बसचालक अशा संबंधित व्यक्तींची चारित्र्य पडताळणी करण्याबाबत सूचना शाळांना दिल्या आहेत. त्यामुळे, कंत्राटी कर्मचाऱ्यांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तत्काळ शाळेत जमा करावे, असे मुख्याध्यापकांनी आणि व्यवस्थापकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यामुळे त्या-त्या ठिकाणी असणाऱ्या स्थानिक पोलिस यंत्रणेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांची, कामगारांची चारित्र्य पडताळणी करून घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

> शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार शाळेतील विशेषतः कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. त्या-त्या ठिकाणच्या पोलिसांकडून संबंधित कर्मचाऱ्यांची पडताळणी केली जात आहे. परंतु, केवळ चारित्र्य पडताळणी करून प्रश्न सुटणार आहे का, अनेक घटनांमध्ये संबंधित आरोपी पुराव्याअभावी आणि दबावामुळे सुटतात. त्यामुळे शासन आणि पोलिस यंत्रणेने त्याबाबत सक्षम पावले उचलायला हवीत.
> **- नंदकुमार सागर,** अध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ

> शिक्षण विभागांसह शहर पोलिस आयुक्तांनीदेखील शाळेतील कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करण्यात यावी, अशी सूचना दिली. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते शाळा व्यवस्थापनाकडे जतन करू ठेवण्यात येईल. परंतु, एकदा हे प्रमाणपत्र काढल्यानंतर ते कधीपर्यंत ग्राह्य धरले जाईल, काही ठराविक वर्षानंतर परत नव्याने चारित्र्य पडताळणी करून घ्यायची की नाही, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही.
> **- सुजित जगताप,** अध्यक्ष, पुणे शहर मुख्याध्यापक संघ

---

# गुन्हेगारांच्या बेकायदा घरांवर फिरणार बुलडोझर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनामुळे शहरातील वाढती गुन्हेगारी आणि टोळ्यातील संघर्ष पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वनराज यांच्या खुनात सहभागी असलेल्या प्रमुख आरोपींचे गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. त्या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी या गुन्हेगारांना चांगलीच अद्दल घडविण्यासाठी त्यांच्या बेकायदा घरावर बुलडोझर फिरविण्याची तयारी केली आहे. गुन्हेगारांनी आपली घरे जर बेकायदा पद्धतीने उभारली असतील, तर त्यावर आता बुलडोझर चालणार आहे.

पोलिसांनी याबाबत माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी सराईत गुन्हेगारांच्या बेकायदा घरांची, मालमत्तेची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये काही आरोपी फ्लॅटमध्ये राहात आहेत, तर काही आरोपींची घरे भाड्याची आहेत. त्यांच्या घरांची मालकी तपासली जात असून, त्यामध्ये जर ही घरे सरकारी जागेवर अतिक्रमण करून उभारली असतील, कोणाच्या मालमत्तेत अवैध ताबा मारून बांधली असतील, तर त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

---

## क्रीम वॉर्ड पोस्टिंगने मिळकत विभाग चर्चेत

# मिळकत विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या विविध विभागांमध्ये सध्या बदल्यांचे सत्र सुरू झाले आहे. नियमानुसार एकाच विभागात तीन वर्षे काम केलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अन्य विभागात बदली करण्यात येते. प्रामुख्याने संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुर्वी ज्या विभागात काम केले नाही, त्या विभागात समकक्ष पदांवर त्यांची बदली करण्यात येते. महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मिळकत कर विभागाने देखिल तीन वर्षे काम केलेले कर निरीक्षक आणि विभागीय निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत.

### बदल्यांचे सत्र

● या नियुक्त्यांसाठी व क्रीम वॉर्डमधील पोस्टींगसाठी आर्थिक व्यवहार झाल्याच्याही जोरदार चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. ही चर्चा अगदी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सावध भूमिका घेत एकाच विभागात तीन वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यांची नियमानुसार अन्य विभागात बदली करण्याची भूमिका घेतली आहे. तसेच विभागीय निरीक्षकांच्याही नुकतेच करण्यात आलेल्या अन्य वॉर्डमधील बदल्या रद्द करण्याच्या निर्णयाप्रत हे अधिकारी आल्याची माहिती महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

महापालिकेच्या मिळकत कर विभागात तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेल्या विभागीय निरीक्षकांच्या बदल्या करण्यात येणार असून यापुर्वी या विभागात काम न केलेल्या निरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतला आहे.

या निरीक्षकांच्या 'क्रिम' वॉर्डमध्ये बदल्यांसाठी आर्थिक व्यवहार झाल्याची जोरदार चर्चा वरिष्ठांच्या कानांवर आल्यानंतर वरिष्ठ या निर्णयापर्यंत पोहोचल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

परंतू बदली झालेल्या सुमारे चाळीसहून अधिक निरीक्षकांना अद्याप बदलीच्या ठिकाणी सोडलेले नाही. तसेच ज्या निरीक्षकांना सोडले आहे, त्यांच्या जागेवर पुर्वी मिळकत कर विभागातच काम केलेल्यांना संधी देण्यासाठी हालचाली सुरू आहेत. ही बाब लक्षात आल्याने महापालिकेच्या अन्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शंका उपस्थित केली आहे.

#रा

## ५ रुपयात ५५५ कुटुंबियांच्या घरात गणेशांचे आगमन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणपती उत्सव यंदा लोकं उत्साह पूर्वक साजरा करणार. अनेक लोकांची इच्छा असते गणपती बाप्पाला स्थापन करावे पण आर्थिक परिस्थिती नसते. अश्या अनेक लोकांची इच्छा पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस पार्टीच्या व्यापारी सेल च्या वतीने पूर्ण झाली आहे. सुमारे ५५५ कुटुंबियांना ५ रुपयात गणपती बाप्पा मिळाल्याने अनेकांच्या घरचा गणेशोत्सव आनंदात साजरा होणार आहे. ही योजना कळताच अनेक नागरिकांनी संपर्क सोडून या उपक्रमाचा लाभ घेतला. मूर्ती मिळाळ्यावर त्यांच्यात प्रचंड उत्साह व आनंद निर्माण झालेला पाहण्यात आला. लोकांनी ५ रुपये देऊन महर्षीनगर येथे आपली आवडती बाप्पाची मूर्ती नोंदणीसाठी गर्दी केली होती.

पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी व्यापारी सेल चे अध्यक्ष, भरत सुराणा, योगिता सुराणा (सरचिटणीस, पुणे शहर कॉंग्रेस महिला कॉंग्रेस कमिटी) यांनी हा उपक्रम आयोजित केला होता. पृथ्वीराज धोका, मितेश सोळंकी, चंद्रकांत माने, गिरीश सोळंकी, अरुण कटारिया, मांगीलाल सोळंकी, अनिल गेलडा, अरविंद जैन, रमेश सोनकांबळे, अनुसया गायकवाड आदी उपस्थित होते.



## पहिल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे उद्घाटन

# 'ग्लोबल गणेश समिट' संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'लोकसहभाग, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, गणेशोत्सवादरम्यान परदेशी लोकांना आवश्यक सुविधा, मार्गदर्शन, जागतिक स्तरावर आयोजित होणाऱ्या गणेशोत्सवाला जोडून घेत उत्सवाचे आदानप्रदान झाले, तर ऐतिहासिक परंपरा असलेला गणेशोत्सव जागतिक लोकोत्सव होईल," अशा भावना गणेशोत्सवातील सक्रिय कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे उद्घाटन परदेशी तरुणांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. पुण्यातील गणेशोत्सव आयोजनात अग्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून यावर्षीपासून 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'च्या निमित्ताने ग्लोबल गणेश समितीही यावेळी झाली.



"जगातील अनेक महोत्सवांपेक्षा गणेशोत्सव हा अधिक व्यापक व भव्यदिव्य स्वरूपाचा आहे. परंतु, या उत्सवाला म्हणावी तशी जागतिक स्तरावर ओळख मिळाली नाही. या उत्सवाचा पर्यटन केंद्र म्हणूनही मोठा विकास होऊ शकतो. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी, त्यातून रोजगारनिर्मिती उभारण्यासाठी आणि आपला पारंपरिक व ऐतिहासिक गणेशोत्सव जगभर जाण्यासाठी 'ग्लोबल गणेश फेस्टिवल' आयोजित करण्यात येत आहे."

— वैभव वाघ

"गणेशोत्सव जगाच्या नकाशावर जाण्यासाठी स्थानिक व परदेशी आयोजकांनी एकमेकांशी समन्वय साधायला हवा. वैभवचे काम उल्लेखनीय असून, सातत्याने नाविन्यपूर्ण कल्पना राबवतो."

— डॉ. सतीश देसाई



- परदेशी तरुणांकडून 'ग्लोबल गणेश'चे उद्घाटन;
- जर्मन तरुणीकडून मर्दानी खेळाचे सादरीकरण
- जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत पोहचणे हेच मुख्य धेय
- जागतिक गणेश मंडळे व पुण्यातील गणेश मंडळांचा सामंजस्य करार घडवून आणण्यावर भर दिला जाणार
- जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या स्पर्धांचे देखील आयोजन

### वैविध्यपूर्ण विषयांवर चर्चा

● या समिटमध्ये ग्लोबल गणेशोत्सवाने कशाप्रकारे पुण्याचे अर्थकारण व धार्मिक पर्यटन बदलेल, सोलो ट्रॅव्हलचा गणेशोत्सवाला होणारा फायदा, ग्लोबल गणेश पर्यटन, मोरया हेल्पलाईन, रोटरी क्लबचा ग्लोबल गणेश फेस्टिवलला होणारा फायदा, गणेशोत्सव जागतिक होण्यासाठी शिक्षणसंस्थांची भूमिका काय असेल, भारतीय आयोजकांनी काय करावे, शासनाची धोरणे व उपक्रम काय असावेत. यावेळी 'मोरया हेल्पलाईन'ची घोषणा करण्यात आली.

हॉटेल प्राईड येथे आयोजित कार्यक्रमावेळी आफ्रिकन विद्यार्थी त्रिश व त्रोबा, जर्मन विद्यार्थिनी लोताया, डॉ. रघुनाथ कुचिक, डॉ. सतीश देसाई, रामनाथ सोनवणे, संयोजक वैभव वाघ, महेश सूर्यवंशी, शिरीष मोहिते, उदय जगताप, ॲड. अनिष पाडेकर, विनीत परदेशी, पियुष शहा, नितीन पंडित, धनश्री वाघ-पाटील, अनिरुद्ध येवले, योगेश आलेकरी आदी उपस्थित होते.

## अवतीभवती
CITY UPDATE



### भारताच्या आजी-माजी महिला राष्ट्रपतींची पुण्यात भेट

**पुणे :** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची पुण्यात प्रतिभाताई पाटील यांच्या निवासस्थानी नुकतीच भेट झाली. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती व विद्यमान महिला राष्ट्रपती यांची ही अनोखी भेट होती. बाललैंगिक अत्याचार व महिला सक्षमीकरण याविषयी त्यांनी चर्चा केली. यावेळी कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट व श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग तर्फे दोन्ही संस्थानचे विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा सन्मान केला.यावेळी प्रतिभाताई पाटील यांचे सुपुत्र माजी आमदार रावसाहेब शेखावत, कन्या ज्योती राठोड उपस्थित होते. ॲड. प्रताप परदेशी म्हणाले, यावेळी आजी व माजी राष्ट्रपतींनी महिलांवरील वाढते अत्याचार व महिला सक्षमीकरणाविषयी चर्चा केली.

### उत्सवात मध्यभागात मद्यविक्री बंद

**पुणे :** गणेशोत्सवाच्या काळात मध्यभागातील मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना पाठविला आहे. उत्सवाच्या काळात खडक, फरासखाना, विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्यात यावी, अशी सूचना मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांच्या बैठकीत नुकतीच केली होती. त्यानंतर पोलीस आयुक्तांनी जिल्हा प्रशासनाला प्रस्ताव पाठविला आहे. वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज शनिवारपासून (७ सप्टेंबर) होणार आहे. उत्सवाच्या कालावधीत मध्यभागातील मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याची सूचना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत केली होती. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनेनंतर खडक, विश्रामबाग, फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्य विक्री दुकाने (वाइन शॉप, परमिट रुम) दहा दिवस बंद ठेवण्यात यावीत, असा प्रस्ताव जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. उत्सवाच्या काळात जिल्हा प्रशासनाने तीन दिवस मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याचे (ड्राय डे) आदेश दिले आहेत. प्रतिष्ठापना (७ सप्टेंबर), विसर्जन मिरवणूक (१७ सप्टेंबर) आणि मिरवणूक संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी (१८ सप्टेंबर) मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

## काश्मीरमधील मराठी बांधवांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना

# काश्मीरच्या लाल चौकात बाप्पा विराजमान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. पुण्याचा बाप्पा जम्मू-काश्मीरला पोहोचला असून, काश्मीरच्या श्रीनगरमधील लाल चौकातील पंच हनुमान मंदिरात सर्वधर्म समभाव गणपती बाप्पाच्या मूर्तीची कायमस्वरूपी प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सीमेवर संरक्षण करणारे जवान, काश्मीरमधील मराठी बांधवांच्या हस्ते हा प्राणप्रतिष्ठापना सोहळा शुक्रवारी पार पडला.



» बाप्पा मोरया

पुण्यातील वंदे मातरम् संघटना, सरहद संस्था व युवा फिनिक्स सोसायटी ट्रस्ट यांच्या सहकार्याने गणपती बाप्पांची ही मूर्ती कायमस्वरूपी येथे बसविण्यात आली आहे. 'हम सब एक है', 'जात-धर्म, पंथ फक्त भारतीय', असा नारा देत येणाऱ्या पिढ्यांसाठी ही गणपती बाप्पाची मूर्ती एकतेचे प्रतीक म्हणून देशभरात ओळखली जाईल, असा विश्वास वंदे मातरम् संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष सचिन जामगे यांनी व्यक्त केला. प्रसंगी आयटी सेल प्रमुख विशाल शिंदे, सीमेवरील जवान धनाजी हासबे, अनुप सावंत, चंद्रकांत जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व मराठी बांधव उपस्थित होते.

### पुण्याचा बाप्पा काश्मिरमध्ये

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



» **पुणे :** सीमेवर संरक्षण करणारे जवान, काश्मीरमधील मराठी बांधवांच्या हस्ते हा प्राणप्रतिष्ठापना सोहळा

## पालिकेच्या मिळकतकर विभागाचा ढिसाळ कारभार

# सोळा हजार मिळकतींची नोंदच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नऱ्हे :** महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांतील ग्रामपंचायतींकडे नोंद असलेल्या मिळकतींच्या नोंदी महापालिकेच्या मिळकत कर विभागाकडे घेण्याची मोहीम प्रशासनाने राबविली होती. हे काम मागीलवर्षी नोव्हेंबरपर्यंत होणे अपेक्षित होते. मात्र, व्यावसायीक मिळकती तसेच मोठे गृहप्रकल्प असलेल्या वाघोली, नऱ्हे आणि मांजरी बुद्रुक या तीन गावांतील तब्बल सोळा हजार मिळकतींची नोंद महापालिकेच्या मिळकत कर विभागाकडे झालेली नाही. विशेष असे की मागील तीन वर्षांपासून मिळकत कर विभागाने सर्वसाधारण सभेच्या आदेशानुसार या गावांमधील मिळकतींना मिळकत करांची बिले पाठविली असून करही गोळा करायला सुरूवात केली आहे.

"महापालिकेत समाविष्ट झालेल्या वाघोली, मांजरी बुद्रुक आणि नऱ्हे गावातील १६ हजारांहून अधिक मिळकतींच्या ग्राम पंचायतीकडील नोंदी न घेतल्याने त्या मिळकतींची आकारणी होऊ शकलेली नाही. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. यासंदर्भात संबधित निरीक्षकांना वेळोवेळी नोटीस बजावण्यात आल्यानंतरही नोंदी झालेल्या नाहीत. त्यामुळे त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला."

— माधव जगताप, कर आकारणी व कर संकलन प्रमुख

ग्राम पंचायतींकडील मिळकतींच्या नोंदी विहीत मुदतीत मिळकत कर विभागाकडे न घेणाऱ्या वाघोली, नऱ्हे आणि मांजरी बुद्रुक या तीन गावांतील तब्बल ३७ मिळकत कर निरीक्षकांचे वेतन थांबविण्यात आले असून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, अशी माहिती मिळकत कर विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी दिली. परंतू वाघोली, नऱ्हे आणि मांजरी बुद्रुक गावातील सोळा हजारांहून अधिक ग्राम पंचायतींकडे नोंद असलेल्या मिळकतींची मिळकत कर विभागाकडे नोंदणीच झालेली नाही. ही बाब लक्षात आली.

## प्रशासनाची उदासिनता

# जी २० च्या स्ट्रीट फर्निचरची ऐशीतैशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेने मागीलवर्षी जी २० च्या निमित्ताने प्रमुख रस्त्यांवर स्ट्रीट फर्निचर करून घेतले आहे. यासोबतच सीएसआरच्या माध्यमांतून वाहतूक बेटांचीही सजावट केली आहे. परंतू जी २० संपल्यानंतर केवळ महापालिका प्रशासनाच्या उदासिनतेमुळे या सजावटीची ऐशीतैशी झाली आहे. क्षेत्रिय कार्यालयांकडे अंतर्गत स्वच्छतेसाठी मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यांच्याकडे प्रमुख रस्त्यांची स्वच्छता करण्यासाठी मनुष्यबळ व पुरेशी यंत्रणा नाही. त्यामुळे अनेक रस्ते आणि पुलांवर देखिल कचरा आणि मातीचे ढीग आढळून येत असल्याचे पाहायला मिळत आहे.

"मॅकेनिकल स्विपिंगच्या निविदा ३५ टक्क्यांहून अधिक दराने आल्याने फेरनिविदा काढण्यात यावी, असे निवेदन महापालिका आयुक्तांकडे ठेवण्यात आले आहे. आयुक्तांच्या आदेशानंतर पुढील निर्णय होईल. तूर्तास क्षेत्रिय कार्यालयांना त्यांच्या हद्दीतील रस्त्यांची स्वच्छता करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच हडपसर- वानवडी झोनमधील ठेकेदारांच्या वाहनांचीही मदत घेण्यात येत आहे."

— संदीप कदम, घन कचरा विभागाचे प्रमुख

महापालिकेचा हडपसर, वानवडी झोन वगळता संपुर्ण शहरातील प्रमुख रस्त्यांवरील 'मॅकेनिकल' स्विपिंगचे काम मागील सहा महिन्यांपासून ठप्प आहे. यामुळे या रस्त्यांच्या कडेला मोठ्याप्रमाणावर अस्वच्छता दिसत असून धुळीचे लोटही उधळत आहेत.घन कचरा विभागाकडून निविदा राबविण्यास झालेला विलंब, निविदा राबविताना 'सल्लागाराने' दिलेला चुकीचा सल्ला यामुळे ३५ टक्के अधिक दराने आलेल्या निविदा यामुळे स्वच्छतेचा 'बट्ट्याबोळ' झाला आहे. केवळ स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेसाठी तीन ते चार महिने विशेष प्रयत्न करणाऱ्या प्रशासनाचा खरा चेहेरा यानिमित्ताने समोर आला आहे.

## RS NEWS DIGEST

**दिलासा**



### मध्यरात्रीपर्यंत प्रवासी मेट्रो सेवा सुरू राहणार

**पुणे :** गणेशोत्सवाच्या काळात मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहे. तसेच मेट्रोच्या फेऱ्यांमध्येही वाढ करण्यात येणार आहे. मेट्रोच्या या सेवेमुळे शहरातील वाहतुकीची कोंडी कमी होण्याची शक्यता आहे. शहरातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी बाहेरून नागरिक मोठ्या संख्येने पुण्यात येत असतात. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या सुविधेसाठी मेट्रो प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. मेट्रोची सेवा मध्यरात्री पर्यंत सुरू राहणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी (१७ सप्टेंबर) ते १८ सप्टेंबर (बुधवार) रोजी सकाळी सहा ते दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजेपर्यंत असे एकूण २४ तास मेट्रोची सेवा अखंड सुरू राहणार आहे. शनिवार (७ सप्टेंबर) ते सोमवार (९ सप्टेंबर) या दोन दिवसात मेट्रो सकाळी सहा ते रात्री अकरा पर्यंत सुरू राहील. तर, मंगळवार (१० सप्टेंबर) ते सोमवार (१६ सप्टेंबर) या कालावधीत सकाळी सहा ते रात्री बारा पर्यंत मेट्रो सेवा सुरू राहणार आहे.




**शिक्षकदिन विशेष**

### शिक्षक म्हणजे जीवन जगण्याचे कौशल्य देणारे विद्यापीठ : प्रा. गरड

**पुणे :** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे प्रख्यात व्याख्याते व लेखक प्रा. विशाल गरड, कार्यक्रमाचे अध्यक्ष रविंद्र कदम, उपआयुक्त सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्य, संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, संयुक्त चिटणीस अॅड.भगवानराव साळुंखे, खजिनदार विजयसिंह जेधे यांचे हस्ते माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या विविध शिक्षण शाखातील शिक्षकांचा अध्यापनात विशेष नैपुण्यासाठी सत्कार करण्यात आला. प्रा. विशाल गारड यांनी राजर्षी शाहू महाराजांचा वारसा अविरतपणे चालविणाऱ्या, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणून गोरगरीब, ग्रामीण भागातील मुलांच्या राहण्याची, जेवणाची सोय करून शिक्षणाची द्वारे खुली करणाऱ्या स्व. उत्तमराव पाटील यांच्या कार्याचे स्मरण केले.

**मागणी**

### जात प्रमाणपत्र अटी शिथिल कराव्यात आप ची मागणी



**पुणे :** शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतानाच जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे. त्यामुळे अनेक अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रम शैक्षणिक २०२४-२५ या वर्षी अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता जास्त उद्भवते. अनुसूचित जाती, भटक्या जमाती, आणि विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहणार. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, फातिमा अभिषेक, अण्णाभाऊ साठे यांना शिक्षणसाठी मोठा संघर्ष करावा लागला. याच पुण्याच्या माहेरी संघर्ष काय नवीन नाही. परंतु जात पडताळणी समितीच्या भोंगळ कारभारामुळे त्याचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत आहे. सरकारची तळमळ विद्यार्थ्यांना ज्या योजना जाहीर केल्या होत्या, तो लाटण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री करतायेत की काय असा प्रश्न उद्भवतो. त्यामुळे तातडीने विद्यार्थ्याचा आलेला अर्ज जात पडताळणी दाखला विशेष मोहीम हाती घेऊन देण्यात यावा.

**उत्सव**

### ढोल-ताशा पथकांचे बुकिंग फुल

**पुणे :** गणारायचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी ढोल-ताशा पथके सज्ज झाली असून, ९० टक्क्यांहून अधिक पथकांचे सार्वजनिक गणेश मंडळाकडून गणरायाच्या आगमनाच्या मिरवणुकीसाठी बुकिंग झाले आहे.
शहरात सुमारे १२५हून अधिक ढोल-ताशा पथके आहेत. प्रत्येक पथकात किमान १००हून अधिक वादकांचा समावेश आहे. दीड-दोन महिन्यांपासून गणेशोत्सवासाठी त्यांची तयारी सुरू आहे. आता शेवटच्याक्षणी वाद्यांची देखभाल दुरुस्ती करणे, गणवेश घेणे, ताशाच्या काड्या खरेदीसाठी वादकांची लगबग सुरू आहे. अनेक पथकांना गणरायाचे स्वागत करण्यासाठी पहिल्या दिवशीच दोन-तीन मंडळांकडून आमंत्रण आले आहे. त्यासाठीची वाहतूक व्यवस्था करण्यावर पथकांकडून भर देण्यात येत आहे. अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनीही पथकांना आमंत्रण दिले आहे. ढोल-ताशा पथकांमध्ये या वर्षी तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसतोय. त्यामुळे पथकामध्ये वादकांची संख्याही वाढली आहे. जास्तीत जास्त मिरवणुका आम्ही बुक केल्या आहेत. यासोबत सरावादरम्यान आणि मिरवणुकीदरम्यान शासकीय नियमांना धरून आम्ही वादन करण्याचे योजिले आहे. त्यामुळे आता प्रतीक्षा फक्त गणरायाच्या आगमनाची असल्याचे चित्र आहे.

**आवाहन**

### मनमानी प्रवासभाडे आकारणीबाबत तक्रार नोंदवा : आरटीओच्या सूचना

**पुणे :** खासगी कंत्राटी प्रवासी वाहनांकडून प्रति कि.मी. भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक किंवा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या भाडेदराच्या दीडपटीपेक्षा अधिक भाडेदर आकारणी केली गेल्यास rtopune@gmail.com या ई-मेलवर किंवा ८२७५३३०१०१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांनी केले आहे. खासगी वाहतूकदारांकडून प्रवाशांना जादा भाडे आकारण्याच्या प्रवृतीला आळा घालण्यासाठी व रस्ता सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने ३० सप्टेंबरपर्यंत तपासणी व मनमानी भाडे आकारणीबाबत मोहीम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या टप्पा वाहतूकीचे भाडेदर विचारात घेवून खासगी बसचे त्या संवर्गासाठीचे कमाल भाडे परिवहन महामंडळाच्या बसेसच्या भाडेदराच्या दीडपटीपेक्षा अधिक राहणार नाही, असे कमाल भाडेदर शासनाने २७ एप्रिल २०१८ रोजी शासन निर्णय जारी करून निश्चित केले आहेत. शासनाने निश्चित केलेल्या भाडेदरापेक्षा अधिक भाडे आकारणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स, बसेस यांच्याविरोधात कडक कारवाई करण्यात येणार आहे.

## शहरात दर्जेदार शैक्षणिक सुविधा होणार उपलब्ध

# पिंपरी-चिंचवडची वाटचाल 'एज्युकेशन हब'च्या दिशेने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** राज्याचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारच्या मदतीने आणि महानगरपालिका प्रशासनाच्या सकारात्मक सहकार्यामुळे गेल्या १० वर्षांमध्ये शहरातील शिक्षण क्षेत्रात विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. त्यामुळे शहराची वाटचाल 'एज्युकेशन हब'च्या दिशेने सुरू आहे, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला. शहरातील शैक्षणिक उपक्रम आणि प्रकल्पांबाबत आमदार महेश लांडगे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडकरांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, कामगारनगरी, उद्योगनगरी आणि ऑटो हब, आयटी हब अशी दमदार वाटचाल करणारे आपले पिंपरी-चिंचवड शहर देशाच्या कानाकोपऱ्यातून नोकरी, शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या निमित्ताने या शहरात नागरिक वास्तव्य करीत आहेत. म्हणूनच या शहराला 'मिनी इंडिया' म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्या शहरातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, आधुनिक शिक्षणासाठी मुंबई, पुणे यासह राज्याबाहेरील संस्थांमध्ये प्रवेशासाठी पायपीट करावी लागते. त्यामुळे दर्जेदार शैक्षणिक सुविधा शहरात निर्माण व्हाव्यात, असा संकल्प आम्ही केला आहे.

शहरात भारतीय संत परंपरा, महाराष्ट्राचा गौरवशाली वारकरी सांप्रदायाचा वारसा जोपासला जावा. आधुनिक शिक्षणाशी स्पर्धा करतानाच अध्यात्माचाही प्रचार-प्रसार व्हावा या संकल्पनेतून आपण जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आपल्या टाळगाव चिखली येथे सुरू झाले आहे. आजच्या घडीला या शैक्षणिक संकुलामध्ये १ हजार २०० हून अधिक विद्यार्थी वारकरी व आधुनिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. मला सांगायला अभिमान वाटतो की, हे भारतातील पहिले संतपीठ आहे. तसेच, राज्यातील नामांकीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची शाखा आपल्या मोशीमध्ये उभारली जात आहे. पिंपरी-चिंचवड मेडिकल कॉलेज व संशोधन सेंटर व पॅरामेडिकल कॉलेजसुद्धा सुरू होत आहे. विशेष म्हणजे, स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून शहरातील महानगरपालिकेच्या शाळा 'स्मार्ट स्कूल' संकल्पनेतून अध्ययावत करण्यात येत आहेत. तारांगण प्रकल्पामुळे विज्ञान क्षेत्रात मुलांची गोडी वाढती आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

आयआयएम शिक्षण क्षेत्रातील 'माईलस्टोन'...

आगामी काळात आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यवस्थापन क्षेत्रातील शिक्षण उपलब्ध व्हावे. या करिता आयआयएम अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची शाखा आपल्या भोसरी मतदार संघात होते आहे. कला क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे म्हणून केंद्र सरकारच्या पुढाकाराने आपण राष्ट्रीय कला अकादमी उभारण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत. यासह

> शिक्षण क्षेत्रात केवळ नवीन प्रकल्पांना 'रेड कार्पेट' नव्हे, तर शैक्षणिक संस्थांना शहरात पोषक वातावरण निर्माण व्हावे. या करिता आम्ही पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर भर दिला. त्यामुळे "चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर" विकसित झाला. नागरीकरण आणि शैक्षणिक गरजा याचा विचार करुन गेल्या १० वर्षांमध्ये एकूण १० नवीन शाळा उभारण्याचे काम हाती घेतले. त्यापैकी कुदळवाडी, चिखली, जाधववाडी, बोऱ्हाडेवाडी, नेहरुनगर येथील काम पूर्ण झाले असून, डुडुळगाव, दिघी, भोसरी येथील शाळांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, खासगी शाळांच्या संख्या २०६ वर पोहोचली आहे. माझ्या विधानसभा क्षेत्रात खासगी व शासकीय असे तब्बल १ लाख २९ हजार ९६० इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**मावळ:** पावसाने पुन्हा सुरुवात केल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या असून फुलशेती, भाजीपाला, कडधान्य पीक खराब होण्याचा धोका वाढला असून दूध उत्पादनात घट झाली आहे. सप्टेंबरमध्ये अनेक दिवस हजेरी लावलेल्या संततधार पावसाने फुलशेती, भाजीपाला, कडधान्य पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आले होते. परंतु, ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच पावसाने चांगली उघडीप दिल्याने पावसापासून काही प्रमाणात वाचलेल्या फुलशेती, भाजीपाला पिकांना पुन्हा चांगले दिवस आले होते. बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. भाजीपाला, फुलशेती मालांचे बाजारभाव वाढल्याने शेतकऱ्यांना चांगले दिवस आले असतानाच पावसाने पुन्हा हजेरी लावली. त्यामुळे गेल्या महिन्यातील पावसाच्या तडाख्यातून वाचलेली पिके पुन्हा धोक्यात आल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

भाजीपाल्याचे उत्पादन घटले

भात, नाचणी, ऊस या पिकांना पावसाचा फायदा झाला. परंतु सर्वाधिक नुकसान फुलशेती व भाजीपाला पिकांचे झाले असून, सध्या कडधान्य, भुईमूग ही पिके खराब होऊ लागली आहेत. पावसामुळे तोडणीला आलेली फुले, भाजीपाला भिजल्याने खराब होऊन उत्पादन घटले आहे.

जनावरांचे खाद्य व औषधांचा खर्च वाढला



## सत्कार समारंभ...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** शिक्षक दिनानिमित्त सोहम सार्वजनिक ग्रंथालयात प्रशासकीय सेवेत व मिलेट्री सर्विसेसमध्ये सिलेक्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## एमपीएससी यूपीएससी परिक्षेबाबत मार्गदर्शन

# शिक्षक दिनानिमित्त यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शिक्षक दिनानिमित्त सोहम सार्वजनिक ग्रंथालयात प्रशासकीय सेवेत व मिलेट्री सर्विसेसमध्ये सिलेक्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच् एमपीएससी यूपीएससी या विविध अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन सोहळा सोहम सोहळा पार पडला.

याप्रसंगी नंदू कदम अध्यक्ष. संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान, देवदत्त लांडे सर सचिव भारतीय जनता पार्टी, महेंद्र बाविस्कर सचिव भारतीय जनता पार्टी , प्रकाश ब्राम्हणकर ज्येष्ठ नागरिक संघ गंगा स्काय. सोसायटी, त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निधी अगरवाल या नेव्हीमध्ये सब लेफ्टनंट म्हणून त्यांची निवड झाली. त्यांचा सत्कार महापालिका उपायुक्त अण्णा बोधाडे उपआयुक्त पिंपरी चिंचवड मनपा यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रमाणे निधीला घडवणारे तिचे आई वडील. सुधीर कुमार अगरवाल निरुपमा अगरवाल यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महापालिका उपायुक्त अण्णा बोधाडे यांनी निधीचे कौतुक करून तिला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष जगन्नाथ नेरकर यांनी केले. सूत्रसंचालन नंदू कदम यांनी केले.

## मंडळांना सवलतीच्या दरात मिळणार वीजपुरवठा

# सार्वजनिक गणेश मंडळांना अधिकृत वीजजोडणी घेण्याचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सवलतीच्या दराने तात्पुरत्या स्वरूपात अधिकृत वीजजोडणी घ्यावी. तसेच मंडळांनी उत्सवातील देखावे, मंडप, रोषणाई व वीज सुरक्षेतील त्रुटीमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे. ७ ते १७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. महावितरणकडून गणेश उत्सव मंडळांना घरगुती वीजदराप्रमाणेच सवलतीच्या दरात वीजपुरवठा मिळणार आहे.

गणेशोत्सवात काही ठिकाणी अधिकृतपणे वीजजोडणी घेतली जात नाही. अन्य मार्गाने घेतलेल्या वीज जोडणीमुळे मोठ्या प्रमाणात दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण होते. हे प्रकार टाळण्यासाठी महावितरणतर्फे स्वस्त विजेचा पर्याय गणेश मंडळाना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. गणेश मंडळांनी अनधिकृत विजेचा वापर केल्यास भारतीय विद्युत अधिनियम २००३ नुसार कारवाई करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी.

मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत

गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्कीट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलिसांकडून वाहतूक कोंडीची २६ ठिकाणे निश्चित

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील काही ठिकाणी होणाऱ्या सततच्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तसेच त्यावर उपाययोजना राबविण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नियोजन केले आहे. यासाठी पोलिसांकडून वाहतूक कोंडीची २६ ठिकाणे निश्चित करण्यात आल्याचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी व्हर्च्युअल टाऊन हॉल मिटींग या उपक्रमात स्पष्ट केले.

नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना राबविण्यासाठी एक्स (पूर्वीचे ट्विटर) या माध्यमातून बुधवारी हे संवाद सत्र आयोजित केले होते. यावेळी नागरिकांनी सततच्या वाहतूक कोंडीबाबतचे प्रश्न विचारले. त्याबाबत आयुक्तांनी सांगितले की, वाहतूक शाखा, महापालिका, सार्वजनिक वाहतूक विभाग, एनएचएआय यांनी संयुक्तपणे २६ वाहतूक कोंडीची ठिकाणे निश्चित केले आहेत. त्यावर उपाययोजना व अंमलबजावणी सुरू आहे.

## आयुक्त शेखर सिंह यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

# गणेशोत्सवासाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** लहान गणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन हौदांमध्ये आणि शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन घरीच स्वच्छ पाण्यात करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त सिंह यांनी शहरातील सर्व प्रमुख गणेश विसर्जन घाटांची आणि महापालिकेने केलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, गणेश विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर पुरेसे कर्मचारी आणि यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, निर्माल्य कुंडाची व्यवस्था करणे, कृत्रिम विसर्जन हौदांची स्वच्छता आणि डागडुजी करणे अशा विविध सूचनाही आयुक्त सिंह यांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या. रावेत येथील जाधव विसर्जन घाट, थेरगाव या स्थळांची आयुक्तांनी पाहणी केली. #रा



**आयुक्तांच्या सूचना....**
- विसर्जन घाटांवर सुशोभीकरण करावे
- दिशादर्शक व स्थळदर्शक फलक लावावेत
- विसर्जन घाटांवरील निर्माल्यकुंडांची ठिकाणे निश्चित करून फलक लावावेत
- अनुचित प्रकार घडू नये, यासाठी घाटांवर जीवनरक्षकांची नेमणूक करावी
- मध्यवर्ती नियंत्रण कक्ष, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवावी
- नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी

## Selected

### डांगे चौकातील थेरगाव उद्यानातील भगव्या झेंड्याची दुरवस्था




**पिंपरी :** डांगे चौक थेरगाव येथील, छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील, भगव्या झेंड्याची दुरवस्था झाल्यामुळे अनेक नागरिकांच्या भावना दुखवल्या जात आहेत. या बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी क्षेत्रीय कार्यालय अजिंक्य येळे यांना प्रदीप गायकवाड यांनी जुना झेंडा बदलण्या बाबत कळवले आहे. उद्यान विभागातील अधिकारी फक्त साफसफाई कडे लक्ष देत असून, त्यांना हा दुरवस्था झालेल्या झेंडा दिसत नाही किंवा ते तुम्हाला सांगत नाही. ह्या उद्यानात पंचक्रोशीतील नागरिक येत असतात. त्यांना ह्या दुरवस्था झालेल्या झेंड्याची अवस्था पाहवत नाही. तरी तातडीने येथील जुना झालेला झेंडा बदलावा आणि नविन झेंडा बसवावा. येत्या चार दिवसांत येथील झेंडा बदलला नाही तर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चिंचवड विधानसभा मतदारसंघ अजितदादा पवार गट उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड यांनी दिला आहे.

### पिंपरीत'नटेश्वर मंदिर'च्या विद्यार्थिनींकडून 'अर्पण'चे आयोजन

**पिंपरी :** नटेश्वर नृत्यकला मंदिरच्या ज्येष्ठ विद्यार्थिनींच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेला 'अर्पण' हा गुरू अभिवादन सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्यात नटेश्वर नृत्यकला मंदिर, नूपुर नृत्यालय, पदन्यास कथक नृत्यालय, नलिनी नृत्यालय या संस्थानी सहभाग घेतला होता. संतनगर, मोशी प्राधिकरण येथील विरंगुळा केंद्र येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून गुरू शिल्पा भोमे यांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजन आणि दीप प्रज्वलन करून झाली. त्यानंतर श्रध्दा साळवी - देवकर यांनी सरस्वती वंदना सादर केली. सुविधा काळे यांनी ताल-झपताल सादर केला. अभिनय पक्षात डॉ. सुमेधा गाडेकर यांनी आगतपतीका नायिका सादर केली. त्यानंतर विद्यार्थिनींनी तराना, मेघा रे, शिव स्तुती, गणेश ध्रुपद, अभंग, प्रार्थना, कविता माला असे नृत्यकला सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली. निवेदन मंजिरी भाके यांनी केले.

### शिरगाव-परंदवडीतील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे धडे



**पिंपरी:** विद्यार्थी सुरक्षेसाठी शिरगाव-परंदवडी पोलिसांच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे धडे देण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी आपली सुरक्षा कशी करावी याचे ज्ञान मिळावे या उद्देशाने शिरगाव-परंदवडीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक तेजस्विनी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रशिक्षण कार्यशाळेला परंदवडीपासून सुरुवात करण्यात आली. पहिली कार्यशाळा जिल्हा परिषेद प्राथमिक शाळेत घेण्यात आली. यामध्ये गुड टच, बॅड टच, विद्यार्थ्यांचे स्वसंरक्षण, समाज माध्यमांचा वाढता वापर, विद्यार्थ्यांच्या सवयी, मुलांवर होणारा कौटुंबिक व सामाजिक वातावरणाचा परिणाम, प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची खबरदारी, आदी विषयावर वरिष्ठ पोलिस निरीक्षक तेजस्विनी कदम, काजल आघाव, समाधान फरतडे आदींनी मार्गदर्शन केले.

### शेअर बाजाराच्या नावाखाली फसवणूक, गुन्हा दाखल

**पिंपरी :** शेअर मार्केटच्या नावाखाली एका नागरिकाची फसवणूक करण्यात आली. ही घटना गायकवाडनगर, दिघी येथे घडली. याबाबत ४३ वर्षीय नागरिकाने दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अ‍ॅप चालवणारे चालक, व्हॉटस्अ‍ॅप ग्रुपचे अ‍ॅडमीन, बँक खातेदार तसेच तपासात निष्पन्न होणारे इतर आरोपी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना २९ मे ते ३१ जुलै २०२४ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने गायकवाडनगर, दिघी येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना व्हॉटस्अ‍ॅपवर मेसेज आला की, आमच्या मार्गदर्शनाखाली शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला नफा कमवू शकता. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी यांचा मोबाइल नंबर वेगवेगळ्या व्हॉटस्अ‍ॅप ग्रुपला जोडून घेतला. त्यानंतर फिर्यादी यांना एक अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगून त्यात फिर्यादी यांचे स्वतंत्र खाते तयार केले.

**कारेगावात दारु विक्री करणारा पोलिसांच्या जाळ्यात :** ( शिक्रापूर प्रतिनिधी ) कारेगाव ता. शिरूर येथील एस ईन चौक परिसरातील गोवा वाईन समोर एक इसम बेकायादेशीपणे देशी विदेशी दारुच्या बाटल्यांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली, त्यांनतर रांजणगाव एमआयडीसि पोलिसांच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन छापा टाका असता त्यांना एक इसम दारुची विक्री करताना मिळून आला, दरम्यान पोलिसांनी त्याला ताब्यात घेत त्याच्या जवळील दारु साठा जप्त केला.

# भीमाशंकरच्या सभेत शक्तिप्रदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



छाया: सुरेश वाणी

**नारायणगाव :** आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची 2023 24 ची वार्षिक सभाआज गोंधळामध्ये पार पडली.तथापि विषय पत्रिकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर झाले.

या सभेला कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी खासदार शिवाजी आढळराव, कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब भेंडेव संचालक मंडळ उपस्थित होते.

सभेला सुरुवात होण्यापूर्वीचजोरदार घोषणाबाजी झाली.सत्ताधारी मंडळींकडून सहकार महर्षी दिलीप वळसे पाटील यांच्या नावाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. कारखान्याचे संचालक देवदत्त निकम वार्षिक सभेला आल्यावर त्यांच्यासमोर दिलीप वळसे पाटील जिंदाबाद अशा प्रकारच्या जोरदार घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. देवदत्त निकम व्यासपीठावर जात असताना त्यांना व्यासपीठावर जावू दिले नाही. त्यांनी व्यासपीठाच्या खालीच खुर्चीवर बसणे पसंत केले. यावेळी त्यांच्या समवेत काही त्यांचे कार्यकर्ते होते. या ठिकाणी या लोकांना बसून देऊ नका अशा प्रकारचा आरडाओरड सभासदांनी केला. यांना पाठीमागे सभासदांमध्ये बसवा पुढे बसायची परवानगी देऊ नका अशी तक्रार सभासदांची होती. यावेळी जोरदार घोषणाबाजी झाले. या सगळ्यांना आवरणे पोलिसांच्या हाताबाहेर

## विषय एकमताने मंजूर

जाताना दिसत होते. स्वतः सहकार मंत्री हातामध्ये माईक घेऊन सगळ्यांनी शांत रहा, अशा प्रकारचे आवाहन करून देखील लोक ऐकत नव्हते. देवदत्त निकम समर्थक देखीलत्यांच्या नावाच्या घोषणा देत होते.वळसे पाटील यांच्या बाजूने समर्थक अधिक असल्याने वळसे पाटील जिंदाबाद अशा प्रकारच्या घोषणा जोरजोरात होत होत्या.

याच गोंधळामध्ये कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये भीमाशंकर कारखान्याचा कारभार कशा पद्धतीने पारदर्शक आहेयाचा आढावा त्यांनी मांडला.

तसेच 2023 -24 या आर्थिक वर्षात आडसाली,पूर्व हंगामी सुरू व व खोडवा सर्वाधिक ऊस गाळप करणाऱ्या शेतकऱ्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वार्षिक सभेला सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सभा संपल्यावर देवदत्त निकम यांच्या समर्थकांनी त्यांना खांद्यावर घेऊन मिरवणूक काढली. तसेच कारखान्याच्या समर्थकांनी देखील शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा यांना खांद्यावर घेऊनमिरवणूक काढली.

दोन्ही बाजूंनी आम्ही कसे बरोबर आहोत अशा प्रकारचा दावा करण्यात आला. तथापि भीमाशंकर कारखान्याच्या इतिहासातील या सभेमध्ये एवढा गोंधळ पाहायला मिळाला.

दरम्यान विधानसभेची निवडणूक पुढ्यात असल्यामुळे दोन्ही बाजूने शक्तिप्रदर्शन करण्यात आले असे यावेळी बोलण्यात आले. सहकार क्षेत्र मध्ये राजकारण नको अशा प्रकारच्या भावना यावेळी सभासदांनी व्यक्त केल्या. कारखान्याचे संचालक देवदत्त निकम यांनी उसाला बाजारभाव 3325 रुपये मिळू शकतोअसा दावा केला.तर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे म्हणाले की भीमाशंकर कारखान्याचा कारभार चांगला असताना देखील देवदत्त निकम व त्यांच्या सहकाऱ्यांनी घोषणाबाजी करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला.

## जेजुरी शहराच्या पाणीपुरवठयासाठी ७८ कोटी रुपये मंजूर

# जेजुरी शहराला वीर धरणातून पाणी पुरवठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मंजूरी:** जेजुरी नगरपालिका सभागृहात पत्रकार परिषदेमध्ये माहिती देताना माजी राज्यमंत्री विजय शिवतारे

**जेजुरी:** जेजुरी शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढत आहे.भाविकांची संख्याही वाढत आहे.भविष्य काळाचा वेध घेता औद्योगिक वसाहत विस्तारीकरणाला प्राधान्य देण्यात येणार आहे.पुढील ५० वर्षाचे धोरण ठेवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या नगरोत्थान योजनेतून जेजुरी शहरासाठी सुमारे ७८ कोटी रुपयांची वीर धरण ते जेजुरी पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.अशी माहिती माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी जेजुरी येथे पत्रकार परिषदेत दिली.

५ सप्टेंबर २०२४ काढण्यात आलेल्या अध्यादेशानुसार ३ दिवसांमध्ये टेंडर काढणे, ७ दिवसांमध्ये निविदा प्रसारित करणे व ९० दिवसांमध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे आदेश वरिष्ठ पातळीवरून प्राप्त झाले आहेत. सर्व निविदा प्रक्रिया राबविताना पात्र व गुणवत्ता असलेल्या ठेकेदाराला हे काम देण्यात येणार आहे.कोणतीही तडजोड यामध्ये केली जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल . अशी माहिती माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी जेजुरी येथे नगरपालिका सभागृहात दिली.

यावेळी मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, शिवसेना शहरप्रमुख विठ्ठल सोनवणे, माजी नगराध्यक्ष मनोहर भापकर, रोहिदास कुंभार, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, रमेश बयास, मुकुंद बेलसरे, लताताई दोडके, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय शिवतारे पुढे म्हणाले की, नीरा देवधर ,भाटघर ,वीर आदी तीन धरणांची भौगोलिक रचना पाहता पुरंदरला पाण्याची उपलब्धता सर्वात जास्त आहे. सर्वात महत्वाचे तिन्ही धरणातील पाणी नैसर्गिक स्रोत असलेले प्रदूषणमुक्त आहे. वीर धरणातील ७:५ टीएमसी पाणी राखीव व उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील शहरे व जेजुरी औद्योगिक विस्तारीकरणाला मोठा वाव आहे. राष्ट्रीय महामार्ग येथून गेल्यामुळे विकासाला गती मिळणार आहे. रस्ते ,वीज पाणी आणि भुयारी गटारे यांचे नियोजन करणे, शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेली जिल्हा परिषद मालकीची जागा नगरपालिकेकडे हस्तांतरित करून या ठिकाणी भाविकांसाठी भक्तनिवास,स्थानिक भूमिपुत्रांना व्यापारी संकुल उभारणे, आयटीआय च्या जागेत आठवडेबाजार स्थलांतरित करणे, आदी कामांना पुढील काळात गती देणार आहे. यासाठी वरिष्ठ पातळीवरून आवश्यक त्या परवानग्या व मंजुरी मिळवण्यासाठी नगरपालिकेला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे शिवतारे यांनी सांगितले.

### हद्दवाढीशिवाय विकास अशक्य

● जेजुरी शहराचा विकास आणि सोयीसुविधा निर्माण करायच्या असतील तर हद्दवाढीशिवाय पर्याय नाही .आजूबाजूचा ग्रामीण भाग, वाड्या -वस्त्या नगरपालिका कार्यकक्षेत येणे गरजेचे आहे.त्यांचेही भविष्यात रस्ते,वीज ,पाणी ,आदी समस्या सुटणार आहेत. जेजुरी ग्रामीण भाग हा महसुली गाव म्हणून स्वातंत्र्य झाला असला तरी शासन आदेशानुसार पुन्हा जेजुरी नगरपालिकेमध्ये समाविष्ट होऊ शकतो. पुरंदर मध्ये विमानतळ झाले तर येथील उद्योग व्यवसायाला गती मिळणार आहे.त्यामुळे विमानतळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे शिवतारे यांनी सांगितले.

# आई हा मुलाचा पहिला गुरू





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे व्यक्तिमत्व म्हणजे शिक्षक होय. आई हा मुलाचा पहिला गुरू तर शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला दुसरा महत्त्वाचा गुरू असतो. आपल्याला घडविण्यामध्ये महत्त्वाचे योगदान असणाऱ्या शिक्षकाविषयी कृतज्ञता व्यक्त करून गुरुदक्षिणा देण्याची परंपरा प्राचीन भारतीय संस्कृतीपासून आहे. आपल्या पाल्याला अनमोल मार्गदर्शन करतानाच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये दैदिप्यमान यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकदिनी त्यांना अनमोल भेट देऊन गुरुदक्षिणा दिल्याची घटना पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळकरवाडी (ता. खेड) येथे घडली आहे.

टाकळकरवाडी शाळेतील उत्तम शिष्यवृत्ती मार्गदर्शक आदर्श शिक्षिका शमिम इनामदार - शेख यांनी मागील पाच वर्षापासून सातत्याने आपल्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उत्तम प्रकारचे मार्गदर्शन केले आहे. मंथन , आय. एम. विनर या परीक्षांमधील यशाबरोबरच त्यांचे शिष्यवृत्ती पाचवीच्या परीक्षेत त्यांचे 14 विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले आहेत तर 2 विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी पात्र झाले असून 2 विद्यार्थी सैनिक स्कूल साठी निवडले गेले आहेत. आपल्या पाल्याला मिळालेल्या या दैदिप्यमान यशाचे सर्व श्रेय शिक्षकांचे आहे.

## धामणीच्या खंडोबा देवस्थानला 'जयविजय' शिल्प अर्पण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** धामणी ( ता.आंबेगांव)येथील कुलस्वामी श्री म्हाळसाकांत खंडोबा देवस्थानाचे महात्म्य खूप मोठे आहे.नगर.नाशिक व पुणे जिल्ह्यातील भाविक येथे तळीभंडार करण्यासाठी येतात देवस्थानाने विविध विकास कामे करुन मंदिर व परिसर सुशोभित केलेला आहे.असे गौरवोदगार भिमाशंकर साखर कारखान्याचे संचालक व आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अंकित अर्जुनराव जाधव (नांदूर) यांनी केले.श्रावण वद्य सोमवती अमावस्येच्या दिवशी सोमवारी येथील खंडोबा देवस्थानाच्या मल्हार महाद्वाराच्या दोन्ही बाजूला जयपूर (राजस्थान) येथून चांडोह (ता. शिरुर) येथील बबन अर्जुन भुमकर व ठाणे (मुंबई) येथील प्रा.राजाराम बबन विधाटे यांनी आणलेल्या साडेपांच फूट उंचीचे संगमरवरी " जयविजय „ शिल्पाचे अर्पण सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

## सुरक्षारक्षकाने लांबवले पंचेचाळीस हजार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील बाजल लिमिटेड कंपनीत कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने एका इसमाचा मोबाईल चोरून त्यातील फोन पे द्वारे तब्बल पंचेचाळीस हजार रुपये लांबवल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे सुरक्षारक्षक अंकुश इंगळे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील बाजल लिमिटेड कंपनीत कंपनीत कामाला असलेला सुरक्षा रक्षक अंकुश इंगळे याने मोहम्मद हुसेन याचा मोबाईल चोरून नेला, त्यांनतर दोन दिवसांनी हुसेन याच्या फोन पे मधून वेळोवेळी पंचेचाळीस हजार रुपये ट्रान्सफर केले असल्याचे समोर आले,

## विद्यार्थी व नागरिकांनी समाजात वावरताना कायद्याचे पालन करणे अपेक्षित

# नागरिकांस कायद्याची ओळख असावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** विद्यार्थी व नागरिकांनी समाजात वावरताना कायद्याचे पालन करणे अपेक्षित असून त्यासाठी त्यांना कायद्याची ओळख असावी, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.एस.सय्यद यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, खेड तालुका विधी सेवा समिती व खेड तालुका बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कायदेविषयक जनजागृती शिबिरात बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. पी. पोळ, ए. ए. घाणिवाले, दिवाणी न्यायाधीश पी.एस. इंगळे, ए. बी. होडावडेकर, ए. एम. हुसेन, एस. बी. पवार, एस. विश्वंभरन, एस. बी. नाईकनवरे - गरड, जे. व्ही. मस्के, सहायक पोलीस निरीक्षक स्नेहल गुरव, खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. रोहीदास टाकळकर, उपाध्यक्ष ॲड. अमोल तळेकर, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, खेड बार असोसिएशनचे सर्व सदस्य आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या कायदेविषयक जनजागृती शिबिरात रॅगिंग, बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण व आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

न्यायाधीश एस.एस. सय्यद यांनी बोलताना संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीबद्दल आनंद व्यक्त करून संस्थेच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक कायद्यांविषयी माहिती दिली. कुठलीही गोष्ट अशक्य नाही, मनापासून अभ्यास करा, स्वप्न उंच ठेवा आणि त्याच्या पूर्तीसाठी कठोर मेहनत घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

न्यायाधीश एस.बी. नाईकनवरे - गरड यांनी विधी साक्षरता या विषयावर माहिती देताना विद्यार्थ्यांना विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करण्याचे आवाहन केले. न्यायाधीश एस. विश्वंभरन यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सर्वोत्तमाचा ध्यास घ्या. समाजाभिमुख व्हा असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. ॲड. निलेश चौधरी यांनी रॅगिंग प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगून लैंगिक शिक्षणाची गरज व्यक्त केली.

#रा

## » Selected



### मंचर-शिरूररस्त्यावर वाढले अपघाताचे प्रमाण

**लोणी-धामणी :** मंचर वैदवाडी फाटा ते शिरूर (ता.आंबेगाव ) या रस्त्यावर सध्या अपघाताचे प्रमाण वाढले असून झाजूर्णे बाबा मंदिरा नजदिक शुक्रवार (दि.०६) रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास समोरच्या पिकअप गाडीने हुलकावणी दिल्याने वॅगेनार मारूती कार पल्टी झाली. कारमध्ये दोघे जण होते.मात्र त्यांना कुठलीही दुखापत झाली नाही. या संदर्भात समजलेली माहिती अशी कि,मारूती व्हगणार कार एमएच-१६ / एटी-१७०८ हि मारूती व्हगणार कार मंचर शिरूर रस्त्याने वैदवाडी पारगाव मार्ग शिरूरला चालली होती.त्याच वेळी कारच्या विरुद्ध दिशेने पिकअप जिप मंचरकडे चालली होती.या दोन्ही गाड्या झाझूर्णे बाबा मंदिराच्या नजदिक समोरा समोर आल्या असता पिकअप जिपने हुलकावणी दिल्याने मारूती व्हगणार कार चालक गाडी बाजूला घेताना रस्त्याच्या कडेला पल्टी झाली. व पिकअप जिप न थांबता पोबारा केला.



### कोथळे आरोग्य उपकेंद्रात लसीकरण मोहीम

**जेजुरी :** प्राथमिक आरोग्य केंद्र बेलसर अंतर्गत उपकेंद्र कोथळे येथे अडल्ट बीसीजी लसीकरण मोहिमे अंतर्गत 18 वर्षावरील ज्यांना मधुमेह आहे तसेच 60 वर्षावरील जेष्ठ नागरिकांना लसीकरण देण्यात आले. भविष्यात टी.बी या आजारापासून संरक्षण होणार असल्याने ही लस घेणे महत्वाचे आहे . याबद्दल मार्गदर्शन तसेच ही लस जुने.टी बी रुग्ण त्यांच्या सहवासातील व्यक्ती , मधुमेह रुग्ण, 60 वर्षावरील व्यक्ती, अशक्त वजन कमी असलेल्या व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती या सर्वांनी लसीकरण करून घ्यावे असे आवाहन डॉ अनुराधा बोऱ्हाडे यांनी ग्रामस्थांना केले. या माहिमेत समुदाय आरोग्य आधिका री प्रेमदास राठोड ,आरोग्य सहाय्यक राजेंद्र शिवली ,सदाशिव कवितके शामल गाढवे ,पुष्पा बढे ,आशा सेविका मनिषा शिर्के व मंगल दोडके जमुना जगताप रोहिदास चव्हाण ,सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय भोईटे आदी कर्मचारी उपस्थित होते.



### जातेगाव बुद्रुकमध्ये वैकुंठ रथाचे लोकार्पण

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक ता. शिरुर ग्रामपंचायतच्या माध्यमातून सरपंच निलेश उमाप यांच्या पुढाकाराने ग्रामस्थांसाठी नुकतेच वैकुंठ रथ अर्थात अंत्ययात्रा रथाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करत वैकुंठ रथ लोकार्पण करण्यात आला आहे.जातेगाव बुद्रुक ता. शिरुर ग्रामपंचायतच्या माध्यमातून नुकतेच वैकुंठ रथ अर्थात अंत्ययात्रा रथ बनविण्यात आला अस्याना पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष उमाप, सरपंच निलेश उमाप, उद्योजक अनिल होळकर, सुनील होळकर, बंडू क्षिरसागर, बाबुराव इंगवले, अनिल इंगवले, आप्पासाहेब मोरे, नवनाथ इंगवले, हमीद पठाण, दिपक मोरे, प्रकाश पोतले, मच्छिंद्र उमाप, प्रकाश इंगवले, उल्हास क्षीरसागर, जितेंद्र कामठे, बाप्पूसाहेब उमाप, बी. बी. रायसोनी, दादा उमाप, बाळासाहेब तुपे, नाथा उमाप, गणेश उमाप, गुलाब उमाप, किरण उमाप, बंटी पवार, हनुमंत पोतले यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रोत्साहन

# शहरात ८५ ठिकाणी गणेशमूर्ती दान केंद्र

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी विसर्जनानंतर मूर्तीदान व संकलन केंद्रांची ८५ ठिकाणी निर्मिती करण्यात आली आहे. नागरिकांनीही मूर्तीदान करून अथवा कृत्रिम विसर्जन घाटांवर मूर्ती विसर्जित करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शालेय स्तरावर पर्यावरणपूरक गणेश मुर्ती निर्मिती व सजावट स्पर्धा आयोजित करणे, नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पर्यावरणपूरक घरगुती सजावट स्पर्धेचे आयोजन करणे अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. याशिवाय विसर्जनाच्या दिवशी सर्व विसर्जन घाटांवर आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यावर महापालिकेने भर दिला आहे.

### क्षेत्रीय कार्यालयानिहाय गणेशमूर्ती दान केंद्र

**• 'अ' क्षेत्रीय कार्यालय**

• साई उद्यान संभाजीनगर, शिवशाहू गार्डन, पिरॅमिड हॉल, शाहूनगर कापसे उद्यान, मोरवाडी, विठ्ठल मंदीर, आकुर्डी, सेन्ट उर्सुला स्कूल गेट आकुर्डी, मोहननगर सांस्कृतिक भवन, दुर्गे चौक, काळभोरनगर, गणेश तलाव जवळ, से. क्र, 26 प्राधिकरण नियोजित महापौर निवास मैदान, से. क्र. 27 प्राधिकरण, खान्देश मराठा मित्र मंडळ, काचघर चौक, से. क्र. 24 प्राधिकरण, कै. पांडुरंग बुवा काळभोर सभागृह, आकुर्डी गावठाण, एम्पायर इस्टेट पुलाखाली, चिंचवड पारिजात बन, सुदर्शननगर, मदर तेरेसा पुलाखाली हॉटेल ईगल जवळ, लिंकरोड, चिंचवड

**• 'ब' क्षेत्रीय कार्यालय**

• मामुर्डी स्मशानभूमी घाट, महादेव मंदिर, किवळे गावठाण, पंचशीलनगर, किवळे, स्मशानभूमी घाट, किवळे, मळेकर वस्ती, जाधव घाट रावेत, चिंचवडगाव, थेरगांव पुल, बिर्ला हॉस्पिटलजवळ, जिजाऊ पर्यटन केंद्र शेजारी एस टी पी प्लांट जवळील घाट चिंचवडगाव, दशक्रिया घाट (जुनी स्मशानभूमी), चिंचवडगाव, केळकर घाट, काकडे पार्क चिंचवडगाव, लक्ष्मीनगर चिंचवडगाव हौद, स्मशानभुमी जवळ, काळेवाडी, आयप्पा मंदिर घाट, नढेनगर, काळेवाडी, ज्योतिबा गार्डन जवळ, काळेवाडी

**• 'क' क्षेत्रीय कार्यालय**



• चिखली स्मशान घाट, मोशी दशक्रिया घाट, गावजत्रा मैदान, भोसरी (अंकुशराव लांडगे नाट्यगृहाजवळ), जलवायु विहार शेजारील मैदान, सेक्टर ६ मोशी, प्राधिकरण क्रीडा संकुल, मासुळकर कॉलनी

**• 'ड' क्षेत्रीय कार्यालय**

• पुनावळे, राम मंदिराच्या शेजारील घाट, स्मशानभूमी घाट ताथवडे, स्मशानभूमी घाट, वाकड गावठाण घाट, इंगवले पुल घाट, चौंधे घाट, कस्पटे वस्ती स्मशानभूमी घाट, पिंपळेनिलख मनपा शाळा, कस्पटे वस्ती मनपा शाळा, दत्तमंदिर घाट, पिंपळेगुरव घाट, तुळजाभवानी मंदिरासमोर माध्यमिक विद्यालय शाळा इमारत, बस स्टॉप समोर, पिंपळेगुरव, बुद्ध विहार, सृष्टी चौकाजवळ, पिंपळेगुरव, स्प्रिंग बिल्डींग, डॉमिनोज पिझ्झा खालील पार्किंग, काशिद पार्क, बी.आर.टी रोड, पिंपळेगुरव

**• 'ई' क्षेत्रीय कार्यालय**

• चऱ्होली घाट जवळ (इंद्रायणी नदी), अलंकापूरम सोसायटी, तापकीर चौक, वडमुखवाडी डुडूळगाव घाट (इंद्रायणी नदी)दाभाडे सरकार चौक, हनुमान कॉलनी, देवेंद्र देवकर यांच्या घराजवळील मैदान, देवकर वस्ती, भोसरी, डोळस मैदान, दिघी गावठाण, कृष्णानगर, दिघी, बोपखेल घाट, राघव मंगल कार्यालय, दिघी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानासमोरील मैदान, दिघी रस्ता भोसरी, गंगोत्री पार्क, दिघी रस्ता भोसरी, बापुजी बुवा चौक, भोसरी

**• 'फ' क्षेत्रीय कार्यालय**

• म्हेत्रेवस्ती शाळा, चिखली, एकता चौक, रुपीनगर, निघोजे पुल, तळवडे, तळवडे गावठाण, ठाकरे ग्राऊंड, (Pimpri) यमुनानगर, शनिमंदिर, पुर्णानगर, टॉवर लाईन, तुळजाभवानी मंदिर, ताम्हाणेवस्ती, गणेश नगर, पांडुरंग पार्क तळवडे

**• 'ग' क्षेत्रीय कार्यालय**

• पवनेश्वर घाट, पिंपरीगाव, जुलेलाल घाट, पिंपरी कॅम्प, स्मशानभुमी घाट, जगतापनगर, थेरगाव, केजू देवी बंधारा, बिर्ला हॉस्पिटल मागे, महादेव मंदिर घाट, काटे पिंपळे, पवनानगर घाट, रहाटणी गावठाण

**• 'ह' क्षेत्रीय कार्यालय**

• कासारवाडी स्मशानभूमी लगत, फुगेवाडी स्मशानभूमी लगत, दापोडी हॅरिस ब्रिज घाट, दापोडी बॉम्बे कॉलनी घाट, श्री वेताळ महाराज घाट, जुनी सांगवी, श्री. दत्त मंदिर घाट, जुनी सांगवी, पवनानगर घाट, जुनी सांगवी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट, सांगवी, वल्लभनगर पाण्याच्या टाकीजवळ विसर्जन एम. के. हॉटेल चौक, नवी सांगवी, फेमस चौक सांगवी

---

## Selected

### कोकणवासी पिंपरी-चिंचवडकरांसाठी 'प्रवास सेवा'



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील कोकणवासीयांसाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रवास सेवा सुलभ व्हावी. या करिता एसटी बस सुविधा सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी पाच बस कोकणात रवाना झाल्या. या उपक्रमाचे कोकणवासीयांनी कौतूक केले आहे. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाकाराने गौरी-गणपतीसाठी कोकणात जाण्यासाठी उत्सुक असलेल्या भोसरी विधानसभा मतदारसंघातील कोकणवासीयांसाठी एसटी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या. गेल्या महिनाभरापासून त्याचे 'बुकिंग' सुरू होते. बुधवारी सायंकाळी पहिल्या ५ बसने कोकणात प्रस्थान केले. यावेळी आमदार महेश लांडगे, विजय परब, विलास गवस, सुधाकर धुरी, अमित महाडिक, सुनील साळुंखे, संदीप साळुंखे यांच्यासह सर्व सिंधुदूर्ग, रत्नागिरी येथील मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी चिखली ते दोडामार्ग, यमुनानगर ते सावंतवाडी, भोसरी ते सावंतवाडी अशा पाच गाड्या प्रवाशांना घेवून रवाना झाल्या. भोसरी मतदारसंघातून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या ठिकाणी जाण्यासाठी आज पुन्हा २१ नवीन एसटी बस प्रवाशांना घेऊन कोकणात जाणार आहेत.

---

# "घरगुती गौरी गणपती सजावट स्पर्धेचे" आयोजन

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**भोसरी :** दमदार आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता भोंगाळे युवा मंच व गायत्री सखी मंचच्या संयुक्त विदयमाने भोसरी प्रभाग क्रमांक पाच मधील नागरिकांसाठी घरगुती गौरी गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे.

गौरी गणपती म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि गौरी गणपती सण प्रचंड उत्साहात, श्रद्धापूर्वक मोठ्या भक्तीभावाने हा सण सर्वत्र साजरा केला जातो. घरगुती गौरी गणपतींना होणारी सजावट लक्षात घेता भोसरी भाजपा महिला मोर्चा व कविता भोंगाळे युवा मंच यांच्या संयुक्त विदयमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही घरगुती गौरी गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास गॅस शेगडी, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास मिक्सर, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास इलेक्ट्रिक शेगडी, चतुर्थ क्रमांकाच्या विजेत्यास टेबल फॅन, पाचव्या क्रमांकाच्या विजेत्यास ईस्त्री तसेच उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून ५ महिला स्पर्धकांना पैठणी साडी देण्यात येणार असून स्पर्धेत सहभागी होणार्या प्रत्येक गणेशभक्तास आकर्षक भेटवस्तू व देण्यात येणार आहे.

---

## देहूत व्यवसाय मार्गदर्शन शिबीर

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहू :** आकुर्डी येथील श्री म्हाळसाकांत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये व्यक्तिमत्त्व विकास व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. पुणे जिल्हा होमगार्डचे जिल्हा समादेशक प्रा. दीपक जांभळे यांनी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. जांभळे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी रोजगार मागणारे न होता रोजगार देणारे व्हावे. तुम्ही कोणतेही क्षेत्र निवडा. परंतु त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा. म्हणजे तुम्ही त्या क्षेत्रात उच्च स्थानावर गेल्याशिवाय राहणार नाही. समाजाची गरज ओळखून विशेष कौशल्य प्राप्त करा."

---

# कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मोशी :** मध्यरात्री कामावरून घरी जात असलेला व्यक्ती रस्ता ओलांडत असताना त्याला भरधाव कारने धडक दिली. या अपघातात व्यक्तीचा मृत्यू झाला. हा अपघात बुधवारी (दि. ४) मध्यरात्री दीड वाजता भारत माता चौक, मोशी येथे घडला. अर्जुन पुरन विश्वकर्मा (वय ३२, रा. मोशी) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी दीपक पूर्ण विश्वकर्मा (वय २३) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे त्यानुसार कार चालक विकास सबरलान पूर्ण नाव पत्ता माहिती नाही याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दीपक यांचा भाऊ अर्जुन हा पुणे नाशिक महामार्गावरील मोशीतील भारतमाता चौक येथे रस्ता ओलांडत होता. त्यावेळी भरधाव वेगात आलेल्या एचआर २२ क्यू ४७८५ या कारने जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या अर्जुन यांचा मृत्यू झाला. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

---

## धक्कादायक : कोंढव्याचे कनेक्शन थेट पाकिस्तानपर्यंत

**पुणे:** एटीएसच्या तपासातून पुण्यात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.चीन, पाकिस्तान आणि आखाती देशांतून येणारे फोन लोकल नंबरवर पाठवत कोंढवा येथील बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटर मागील आठ वर्षांपासून सुरू होते. भाडेतत्त्वावर घेण्यात आलेले हे सेंटर तिघेजण चालवत होते.त्यातील दोन आरोपी आठवी पास, तर एक उच्चशिक्षित आहे.तिघांनाही सेंटर कसे चालवायचे हे माहिती होते व त्यांनी ऑनलाइन ग्राहक मिळविले होते, अशी माहिती दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) केलेल्या तपासातून पुढे आली आहे. या गुन्ह्यात एटीएसने नौशाद अहमद सिद्धिकी ऊर्फ कुमार (३२, रा. कोंढवा) आणि महम्मद उजैर शौकत अली अन्सारी ऊर्फ सोनू (२९, भिवंडी) या दोघांना मंगळवारी (ता. ३), तर पियुष सुभाषराव गजभिये (२९ रा. वर्धा) याला बुधवारी (ता. ४) सकाळी अटक केली आहे. तिन्ही आरोपींना बुधवारी वानवडी येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते. आरोपी नौशाद हा कोंढव्यात भाडेतत्त्वावरील घरात राहात होता. तीनही आरोपी एकमेकांचे मित्र असून, पूर्वी भिवंडीमध्ये राहात होते. नौशाद आणि सोनू आठवी पास, तर पियूषने संगणकविषयक डिप्लोमा केला आहे. मागील आठ वर्षांपासून हे सेंटर सुरू होते. आरोपींकडून जप्त केलेली सिमकार्ड आणि राउटर्स न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवायचे आहेत, तसेच गुह्याच्या सखोल तपासासाठी तिघांना पोलिस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील बोधिनी शशीकर यांनी केली.

---

# माजी मंत्र्यांनी घेतला पिंपरी, चिंचवड विधानसभांचा आढावा

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुजरातचे माजी गृहमंत्री तथा प्रवासी प्रभारी नेता प्रदीपसिंह जडेजा यांनी आज पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभांचा आढावा घेतला. तसेच, पक्षाने केलेली विकासकामे, पक्षाची बूथ रचना, मतदार नोंदणी याबाबत माहिती घेवून तिनही विधानसभा निहाय पदाधिका-यांसोबत चर्चा करून मार्गदर्शन केले. यावेळी, शहराच्यावतीने शंकर जगताप यांनी श्री. जडेजा यांचे स्वागत केले.

यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार महेशदादा लांडगे, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार उमाताई खापरे, समन्वयक राम गावडे, प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, संतोष कलाटे, महेश कुलकर्णी, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, पिंपरी विधानसभा संयोजक संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैला मोळक, चिंचवड विधानसभा संयोजक काळूराम बारणे, भोसरी विधानसभा संयोजक विकास डोळस, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे यांच्यासह कोअर कमिटी सदस्य, माजी नगरसेवक - नगरसेविका, विविध मोर्चा अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

प्रदीपसिंग जडेजा यांच्यावर महाराष्ट्रातील मावळ, पिंपरी, चिंचवड, भोसरी, आंबेगाव, जुन्नर, शिरुर, खेड या ८ विधानसभा मतदार संघाची प्रवासी प्रभारी नेता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी यांच्या बैठका मोरवाडी येथील भाजपा पक्ष कार्यालय, हॉटेल कलासागर येथे घेण्यात आल्या.

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाची माहिती दिली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत पिंपरी, चिंचवड, भोसरी मतदारसंघात भाजपनेच मोठा लीड राखला. यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी झोकून देवून काम केले.

---

# ॲथलेटिक ट्रॅक पुन्हा नव्याने उभारणार



**भोसरी :** निकृष्ट कामामुळे दुरवस्था झाल्याने इंद्रायणीनगरातील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलमधील ॲथलेटिक ट्रॅक खेळाडूंना सरावासाठी बंद करण्यात आला आहे. अवघ्या दीडच वर्षात पुन्हा नव्याने ट्रॅकची बांधणी करण्याची नामुष्की पिंपरी-चिंचवड महापालिकेवर आली आहे. हे काम संबंधित ठेकेदारांकडून विनामोबदला करून घेणार असल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. मात्र, महापालिकेच्या चुकांमुळे खेळाडूंच्या झालेल्या नुकसानीला जबाबदार कोण ? असा संतप्त सवाल क्रीडा क्षेत्रामधून विचारला जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील एकमेव ॲथलेटिक ट्रक संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात आहे. मार्च २०२३ पासून दुरुस्तीसाठी बंद केलेला ट्रॅक मार्च २०२४ रोजी सुरू करण्यात आला.

एक-दीड महिना सुरू राहिलेला हा ट्रॅक आता पुन्हा नव्याने उभारणीसाठी बंद करण्यात आला आहे. २१ व २२ सप्टेंबरला राज्यस्तरीय ॲथलेटिक निवड चाचणी होणार आहे. आता पुन्हा हा ट्रॅक बंद झाल्याने ॲथलेटिक खेळाडू सरावास मुकणार आहेत. त्यामुळे, निवड चाचणीत त्यांच्या कामगिरीवरही परिणाम होणार असल्याने खेळाडूंसह त्यांचे प्रशिक्षक चिंतेत आहेत.

ॲथलेटिक ट्रॅकचे पावसाळ्यात काम करता येत नसल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे, हा ट्रॅक नादुरुस्त असला तरीही सरावासाठी खुला करण्याची मागणी खेळाडू आणि प्रशिक्षकांची आहे.

---

पान १ वरून

## जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल

जितेंद्र आव्हाड यांनी सरकारच्या जीआरचा चुकीचा संदर्भ देत सरकारने आता आत्महत्याग्रस्तांच्या कुटुंबांना मदत देणे बंद केल्याचा आरोप केला होता. महाराष्ट्रातील महिला आणि मुलींना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणली आहे. १७ ऑगस्टपासून मुख्यमंत्री माझी लाडकी योजनेला सुरुवात झाली. या योजनेंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १५०० दिले जात आहेत. आर्थिक मदतीद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.

## पोर्शे अपघात प्रकरणात सुनील टिंगरेंचा संबंध?

कल्याणीनगर अपघात प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांनी योग्य पद्धतीने केला. पोलिसांच्या कार्यपद्धती, तसेच तपासाबाबत काहींनी शंका उपस्थित केली. समाज माध्यमात पोलिसांवर टीका करण्यात आली. मात्र, पोलिसांनी तपासात हलगर्जी केली नाही. अपघात प्रकरणात दोषी असलेल्या प्रत्येकावर कारवाई केली. अपघातानंतर आमदार सुनील टिंगरे येरवडा पोलीस ठाण्यात गेले होते. त्यांचीही या प्रकरणात चौकशी झाली. टिंगरे यांनी पोलिसांवर दबाब आणला का नाही, हे आताच सांगणे योग्य होणार नाही. मात्र, टिंगरे यांचा कल्याणीनगर अपघात प्रकरणाशी संबंध असल्याचे चौकशीत उघड झाले, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.

## आता फोगाट-पुनियाची राजकीय आखाड्यात एन्ट्री

काँग्रेस प्रवेशाच्या आधी विनेशनं भारतीय रेल्वे सेवेचा राजीनामा दिला आहे. काँग्रेसमध्ये प्रवेश करताच अपेक्षेप्रमाणे दोघांनीही केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर तोफ डागली. महिलांवरील अत्याचाराविरोधात लढण्यासाठी तयार असलेल्या पक्षात सहभागी झाल्याचा मला अभिमान आहे, असं विनेश म्हणाली.


**TENDER NOTICE**

**ActionAid Association**
Kastur Mahal, Plot No.: 9, Wing – B, Flat No.: 15, First Floor, Sion Station Road, Mumbai - 400022

ActionAid Association invites sealed bids from eligible bidders for supply of Computers which includes delivery charges, installation charges with all GST Amount and commissioning of Computers at Pune (PMC Schools) Pune Rural Schools, Pune location. Computer Details are as under:-

| Sr. No. | Product Name | Configuration | Quantity |
|---|---|---|---|
| 1. | HP Desktop | Intel core i3 Processor 12th Gen 8 GB RAM 512 GB SSD, WiFi port, Bluetooth port | 68 |
| 2. | LED - Monitor | 19.5 inches | 68 |
| 3. | Software | Windows 11 (Lifetime Licensed) Single Language and MS Office 21 (Licensed) | 68 |
| 4. | Accessories | Keyboard and Mouse | 68 each |
| 5. | One Year Company Warranty | | 68 |
| 6. | Plus 2 Years Extended Warranty needed | | 68 |

**Eligibility of Vendors / Suppliers:**
Supplier/Vendor must have GST registration number.
Supplier/Vendor should not be blacklisted in records of Indian Govt.
Any overwriting not acceptable in the tender copy.
Supplier/Vendor should attach their necessary documents like- PAN, Bank Details & GST registration and Income Tax Return is mandatory.
Delivery of Goods (PCs) within 7 Days of Order Placed or Confirmed

The Envelope Should Marked as 'PUNE LOCATION' and Complete set of documents including quotation should reach us to our official address mentioned in this tender on or before 13th September 2024 by 5:00 PM through registered post / courier / Hand Delivery.

**जाहीरनामा**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**
**तुळजापूर येथील मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
एम.ए. नं. 248/2024

ज्यापेक्षा, कै. अशोक नारायणराव शामराज हे दि. 10/10/2023 रोजी पुणे ता. जि. पुणे येथे मयत झाले. मयताचे पश्चात अर्जदार क्र 1. अभय अशोक शामराज रा. दयानंद नगर तुळजापुर, ता. तुळजापुर जि.धाराशिव क्र 2 सौ. राजश्री रविंद्र मुळे रा. पुणे, ता. जि. पुणे क्र 3. सौ. स्वरुपा अरुण जोशी रा. पुणे, ता. जि. पुणे क्र 4. श्रीमती विद्युलता अशोक शामराज रा. दयानंद नगर तुळजापुर, ता. तुळजापुर जि. धाराशिव क्र 5. श्रीमती लता संतोष शामराज रा. दयानंद नगर तुळजापुर, ता. तुळजापुर जि. धाराशिव यांनी हे मयताचे कायदेशीर वारस असुन अर्जदारांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे.

यापेक्षा अर्जदार क्र. 1 ते 5 हे सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास कळविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आंत त्यांनी या न्यायालयास हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यांत येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास सदरहू मयत कै. अशोक नारायणराव शामराज यांचे कायदेशीर वारस असलेचे सर्टिफिकेट देईल.
पुढील नेमलेली तारीख : 15/10/2024
आज रोजी तारीख 06/9/2024

**कनिष्ठ लिपिक,** दिवाणी न्यायालय, क. स्त. तुळजापुर — शिक्का — **सहाय्यक अधिक्षक,** दिवाणी न्यायालय, क. स्त. तुळजापुर

**मैड अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मर्या. उत्तमनगर, पुणे**
नोंदणी क्र.: पीएनए/आरएसआर/ (सीआर)/२४३/२०२४
कार्यालयीन पत्ता- सर्वे नं.१५, मिल नं.१३३ ते १३५ धनसंपदा बिल्डींग, शॉप नं. ०१ शिवणे, उत्तमनगर, पुणे - २३

**संस्था नोदणी नंतरच्या पहिल्या सभेची नोटीस**
(फक्त सभासदाकरिता)

मैड अर्बन को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी मर्या.उत्तमनगर, पुणे या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची पहिली साधारण सभा सोमवार दि. ९/९/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता संस्थेच्या कार्यालयात अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील विषयावर विचार विनिमय करून निर्णय घेण्याकरिता आयोजित केली आहे. सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**
१) दि.२६/५/२०२४ रोजी झालेल्या सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) प्रवर्तक सभासदांची यादी वाचून त्यांना कायम सभासद करणे.
३) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी मंजूर केलेल्या पोटनियम आदर्श उपविधी स्विकृत करणे
४) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी मंजूर केलेले ज्ञापन पत्र वाचून नोंद घेणे
५) प्रवर्तक संचालक मंडळाची निवड करणे
६) संचालक मंडळातून अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार यांची उपविधी प्रमाणे निवड करणे
७) मुख्य प्रवर्तक काळातील संस्था नोंदणी पर्यंत झालेला खर्च वाचून मंजूरी देणे
८) ऐनवेळी येणाऱ्या विषयास मा. अध्यासी अधिकारी यांच्या परवानगीने विचार करणे.

**स्थळ** - उत्तमनगर
**दि.**- २४/०८/२०२४

प्रवर्तकाच्या वतीने
**श्री चेतन काजळे**
मुख्य प्रवर्तक

**विशेष सुचना**
१) सभासदांच्या लेखी सुचना सभेपुर्वी ३ दिवस अगोदर कार्यालयात द्याव्यात. नंतर येणाऱ्या सुचनांवर विचार केला जाणार नाही.
२) पुरेशा गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या पूर्ण होण्याची आवश्यकता राहणार नाही.
३) सभेस येताना सभेची नोटीस प्रत बरोबर आणावी.

**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह यांचे कार्यालय**

**नोटीस**
आरटीएस/अपिल/एसआर/८३५/२०१३
दि. २७/८/२०२४

१. श्री श्रीधर दत्तात्रय वायकर, रा भांबर्डे, ता मुळशी, जि पुणे — अपिलार्थी
**विरुध्द**
१. श्रीमती मिरा लक्ष्मण लुधाणी, तर्फे, श्री शिवाजी गणपतराव माने, रा प्लॉट नं.२, इलेक्ट्रॉनिक सदन क्र.२, गाळा नं.१५ व १६, एम आय डी सी भोसरी पुणे-२६ — प्रतिवादी
२. श्रीमती मंदाकिनी जयंत साठे, रा दापोली अर्बन बँकेजवळ, दापोली, पो दापोली, जि रत्नागीरी,
३. श्रीमती स्नेहन्ल दिनेश सेठ, रा पोलादपुर, जि रायगड
४. श्री रामभाऊ गणपत दिघे, रा हनुमाननगर, राजीव गांधी पार्क जवळ, पौड रोड, पुणे
५. महाराष्ट्र व्हॅली प्रा ली रा चिंतामणी प्लाझा ११२-१२२, पहिला मजला, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी, पुर्व मुंबई,

मौ. भांबर्डे, ता. मुळशी स न ४२१ चे फेरफार क्र. १३९५ मंडल अधिकारी माले यांचेकडील आदेश क्र मअ/एसआर/४/२०१० दि.१८/२/२०१० बाबत अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे अपिल दाखल केले आहे. प्रस्तुतचे अपिल मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील आदेश क्र. आरटीएस / कावि/९४७/२०२१ दि.२१/९/२०२१ अन्वये या कार्यालयाकडे अंतिम निर्णयासाठी वर्ग करण्यात आले आहे. सदर अपिलामध्ये या कार्यालयामध्ये दि. १९/९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी निश्चीत करण्यात आली आहे. सदर सुनावणीचे दिवशी आपण अथवा आपले कायदेशीर प्रतिनिधी यांचेमार्फत आपलेकडील पुराव्याचे कागदपत्रासह सक्षम हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. सदर सुनावणीचे वेळी आपण अनुपस्थित राहील्यास आपले काही एक म्हणणे नाही असे समजुन गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सुनावणीचे ठिकाण:जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह पुणे यांचे कार्यालय, सी विंग दुसरा मजला, पी.एम.टी. बिल्डींग, शंकरशेट रो ड, स्वारगेट, पुणे ४११०३७

शिक्का
सही/-
**उपजिल्हाधिकारी व**
सक्षम प्राधिकारी, पुणे करिता

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती **अशोक गणपत कुंभार** यांचे दि. २१/०५/२०२४ रोजी निधन झाले. त्याचे नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये नोंद असलेली Bajaj Auto Ltdची थ्री व्हिलर पॅसेंजर रीक्षा Mh14 JP 0191 **चॅसीस क्र.** MD2B47 AX2MWL16756 **इंजिन क्र.** AZXWML49785 कलर Black Yellow असा आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नावे कायदेशीर वारस म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहना संदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही, असे गृहीत धरून सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करून घेत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती उषा अशोक कुंभार**
सर्व्हे नं.३८/२, बालाजी कॉलेज समोर, ताथवडे गावठाण, ताथवडे, पुणे - ४११ ०३३ मो.8422987488

## मोहम्मद युनूस यांचा दावा

# आम्ही तालिबानी नाही !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**ढाका:** आम्ही अफगाणिस्तानातील तालिबानी नाही, असे बांगलादेशाचे हंगामी प्रमुख मोहम्मद युनूस यांनी भारताला सांगितले आहे. बांगलादेशातील शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर, तेथील अल्पसंख्याक हिंदूंवर हल्ले होत असून, त्यांची हत्याही केली जात आहे. या पार्श्वभूमीवर यूनूस यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

युनूस म्हणाले की, बांगलादेशाचा अफगाणिस्तान होणार नाही. बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंवर होणारे हल्ले सांप्रदायिकतेपेक्षा राजकीय आहेत, असा दावा त्यांनी केला. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालीच बांगलादेश सुरक्षित राहू शकतो, या जाणीवेतून भारतानेही बाहेर यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले.

बांगलादेशाचे इस्लामीकरण केले जात आहे, अशी कथा भारतात सुरू आहे. बीएनपी देखील इस्लामी आहे. शेख हसीना सत्तेत आहेत, तोपर्यंतच बांगलादेश सुरक्षित आहे, असे भारताला वाटते. असे वाटणे चुकीचे आहे. इतर देशांप्रमाणेच बांगलादेशही आपला शेजारी आहे, हे भारताने समजून घ्यावे. असे आवाहन करत, भारताबरोबरच्या संबंधांमधील तणाव संपवण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतर देशाचे मुख्य सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या युनूस यांनी अल्पसंख्याकांवर हल्ले होत नसल्याचा दावा केला आहे. या घटना जातीय हिंसाचाराचा परिणाम नसून, राजकीय उलथापालथीचा परिणाम असल्याचेही त्यांनी सांगितले. बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ल्यांबाबत भारतात अपप्रचार केला जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

शेख हसीना ५ ऑगस्ट रोजी देश सोडून गेल्यानंतर, बांगलादेशात मोठ्या प्रमाणात हिंसक निदर्शने झाली. या काळात हिंदूंवर हल्ले करणे, त्यांचा व्यवसाय व मालमत्तेची तोडफोड करण्याबरोबरच हिंदू मंदिरेही मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त करण्यात आली.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# कोकणच्या प्रवासात गणेश भक्तांपुढे विघ्न

### वाहतूक कोंडी, रेल्वेला गर्दी



**रत्नागिरी :** गणेशोत्सव साजरा करण्यासाठी लाखो भाविक कोकणच्या दिशेने रवाना होत असताना मुंबई-गोवा महामार्गावर सलग दुसऱ्या दिवशी ट्रॅफिक जॅम झाल्याचे दिसून आले. स्पेशल ट्रेनमुळे कोकण रेल्वेची वाहतूकही कोलमडली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे मार्गावर ३१० जादा गाड्या सोडण्यात आल्या आहेत. काही गणपती स्पेशल गाड्या साडेचार तास उशीराने धावत आहेत. तर नियमित धावणाऱ्या गाड्या दीड तास उशीराने धावत आहेत. यामुळे गणेशोत्सवासाठी येणाऱ्या चाकरमान्यांचा खोळंबा होत असल्याचे दिसून येत आहे. कोकणकन्या, तुतारी, सावंतवाडी गणपती स्पेशल, सिंधुदूर्ग एक्सप्रेस या गाड्या उशिराने धावत आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरही वाहतूक कोंडी झाली आहे. नागोठणे, सुकेळी खिंड, लोणेरे परिसरात ट्रॅफिक जॅम झाली आहे. सकाळपासून महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांसमोर विघ्नच विघ्न येत आहेत. रिमझिम पावसाच्या सरी कोसळत असल्याने चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहने सावकाश चालवण्याच्या सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

## » Selected



# निर्देशांकात घसरण

**मुंबई :** शुक्रवारी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. बंद होताना निर्देशांक १,०१७.२३ अंकांनी घसरून, ८१,१८३.९३ वर तर निफ्टी २९२.९० अंकांनी घसरून २४,८४२.२० वर बंद झाला. सुमारे १,३५९ समभाग वधारले, २,४२२ घसरले आणि ८६ स्थिर राहिले. निफ्टीमध्ये एसबीआय, एचसीएल टेक्नॉलॉजीज, एनटीपीसी, आयसीआयसीआय बँक आणि बीपीसीएलचे समभाग घसरले, तर एशियन पेंट्स, जेएसडब्ल्यू स्टील, बजाज फायनान्स, लिटिमिंदट्री आणि डिव्हिस लॅब्स चे समभाग घसरले. ऑटो, पीएसयू बँक, ऑइल अँड गॅस, मीडिया, टेलिकॉम, आयटी, रियल्टी, कॅपिटल गुड्स हे सर्व सेक्टोरल इंडेक्स १ ते ३ टक्क्यांनी घसरले. बीएसईचा मिडकॅप निर्देशांक १.४ टक्क्यांनी घसरला, तर स्मॉलकॅप निर्देशांक १ टक्क्यांनी घसरला.

शुक्रवारी सकाळी बाजारात जोरदार घसरण झाली. सकाळच्या सत्रात निर्देशांक ८०० अंकांनी घसरला, तो पुन्हा सावरलाच नाही. सर्वात मोठी घसरण स्टेट बँकेच्या समभागामध्ये नोंदवली गेली. दिवसभर हाच कल कायम राहिल्याने, निर्देशांक ८२ हजारांच्या खाली आला.

## नामिबियाला दिला वनताराने हात

# वन्यजीवांना जीवदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** दुष्काळात होरपळणाऱ्या नामिबियाला अनंत अंबानी यांच्या वनतारा संस्थेकडून मदतीचा हात दिला जाणार आहे. वनतारा ही गुजरातमधील प्राण्यांच्या संवर्धनासाठी उभी राहीलेली संस्था असून, आतापर्यंत अनेक प्रजातींना या संस्थेमुळे जीवदान लाभले आहे.

नामिबियातील अधिकाऱ्यांशी दुष्काळाबाबत पत्रव्यवहार करत, वनतारा संस्थेने चिंता व्यक्त केली आहे. माध्यमातील वृत्तानुसार, तेथील परीस्थिती एवढी भीषण आहे, की संसाधानांवर ताण येऊ नये म्हणून; प्राण्यांच्या हत्येचा सुद्धा विचार तेथे केला जातो आहे. मात्र, वनताराने या ऐवजी वेगळा पर्याय सुचवला आहे.

नामिबियासोबत केलेल्या पत्रव्यवहारामदध्ये संस्थेने नमूद केले आहे की, प्राण्यांच्या संवर्धानासाठी तसेच रक्षणासाठी, येणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी वनतारा कटीबद्ध आहे. प्राण्यांची हत्या केली जाऊ नये, यासाठी संस्थेने मदतीचा हात पुढे केला आहे. संस्थेच्या वतीने प्राण्यांची देखभाल केली जाऊ शकते, किंवा त्यांची कायमस्वरूपी काळजी घेण्यात येणार आहे.

वनताराने या पूर्वी देखील अनेक प्राण्यांना मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढले आहे. आता नामिबिया सरकारच्या संयोगाने देशातील वन्यजीवांना अभयारण्य मिळणार आहे. नामिबिया सरकारने आम्ही केलेला प्रस्ताव विचारात घ्यावा, अशी विनंती पत्राद्वारे केली गेली आहे. नामिबिया समोर असलेले दुष्काळाचे आव्हान लक्षात घेता, वनताराने सुचवलेला पर्याय त्यांच्या हिताचा ठरू शकतो.

## मालेगावी चड्डी बनियान, गाऊन गँग सक्रिय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** शहरात चड्डी बनियान गँगने धुमाकूळ घातला असून मनमाड चौफुलीवर सहा दुकाने फोडून लाखोंचा ऐवज त्यांनी लंपास केला आहे. गँगच्या चोरीचा थरार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. यामुळे मालेगाव पोलीस अलर्ट मोडवर आले असून गँगला जेरबंद करण्यासाठी शहर व परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गुरुवारी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास मनमाड चौफुलीवरील खते विक्री, हार्डवेअर, विजेचा पंप, पाणी जार अशी सहा दुकाने या गँगने फोडून लाखोंचा ऐवज लंपास केला आहे. या गँगच्या चोरी सत्राने नागरिक व व्यापाऱ्यांनी धसका घेतला असून गँगचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

# २८८ उमेदवार उभे करा; भुजबळांचे जरांगेना आव्हान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. तुमच्यात हिंमत असेल तर २८८ उमेदवार उभे करा, असे आव्हान मराठा आंदोलन नेते मनोज जरांगे पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी दिले आहे.

मनोज जरांगे पाटील कायम आम्ही सत्ताधाऱ्यांच्या इतक्या जागा पाडणार असे म्हणत असतात. तुम्ही याकडे कसे बघता? असा प्रश्न भुजबळांना विचारण्यात आला. त्यावर भुजबळ यांनी, 'अरे बाबा तुला काय करायचं ते कर पण २८८ जागा लढव', असे म्हटले. "मनोज जरांगे पाटील यांनी रोज भूमिका बदलू नये. उपोषणाला बसतो म्हणतात आणि उठतो. मग म्हणतात मुस्लिमाना आरक्षण द्या. अहो मुस्लिमांना आम्ही आरक्षण दिलं. माहीत नसलेल्या गोष्टीवर ते बोलतात. मध्येच म्हणतात, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणार. ते एकदा म्हणणार, मला राजकारण नको. मला राजकारणात जायचं नाही. परत २८८ उमेदवार पाडण्याचा विचार करणार. एक एकाला बोलावून सर्वांची माहिती घेत आहेत. त्यांना फार गंभीर घेऊ नका, असेही भुजबळांनी म्हटले.

सगेसोयरे अध्यादेश काढलेला नाही. अधिसूचनाही काढली नाही. हे असे करावे का, त्यावर लोकांच्या हरकती मागवल्या, साडेआठ लाख हरकती आल्या. मी रिबेरो, अणे, कुंभकोणी यांनाही विचारले. असं केलं तर कोणीही कोणत्याही आरक्षणात जाईल. दलित समाज, मुस्लिम आणि ब्राह्मण येतील. सगेसोयरे काही होणार नाही. झालं तरी कोर्टात एक मिनिटही टिकणार नाही," असे भुजबळांनी म्हटले.

## निवडणूक मात्र शिंदे यांच्या नेतृत्वातच : फडणवीस

# मुख्यमंत्री कोण, आताच सांगणे कठीण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती आगामी विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातच लढवेल. मात्र, निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होईल याबाबत मी सांगू शकत नाही. तो अधिकार आमच्या पक्षाच्या संसदीय मंडळाचा व राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा असेल, असे महत्वाचे विधान उपमुख्यमंत्री व भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

### पवारांच्या मनातील चेहरा सांगणे कठीण

● फडणवीसांनी महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करण्यावरून चाललेल्या वादावर खोचक टीका केली. ते म्हणाले, "शरद पवारांच्या डोक्यात कोण नाही, हे मला सांगता येईल. पण त्यांच्या डोक्यात कुणाचा चेहरा आहे, हे सांगणे सर्वात कठीण आहे.", अशीही कबुली देवेंद्र फडणवीस यांनी दिली

### आता प्रवक्तेच बोलणार

● गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये धुसफूस सुरु असल्याने महायुतीने एक निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. महायुतीमधील तीनही पक्ष तीन अधिकृत प्रवक्ते निवडणार आहोत. यानंतर हे प्रवक्ते जे बोलतील तेच अधिकृत असेल. या व्यतिरिक्त काहीही अधिकृत असणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर शिवसेनेचे नेते तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांबरोबर बसल्यानंतर बाहेर आल्यावर उलट्या होतात, असे वक्तव्य केले होते. नंतर भाजपच्या एका नेत्याने राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीत घेतल्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांचे वाटोळं झाल्याचे म्हटले होते. अशा प्रकारच्या विधानामुळे महायुतीमधील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला होता. या प्रकारावर फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची विधाने करून आपण आपल्या पक्षालाही खड्यात घालतो आणि महायुतीलाही कमजोर करतो.

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक तोंडावर आली असली तरी अद्याप महायुती व महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरलेला नाही. आघाडीत यावरून वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. महायुतीत मात्र यावर अद्याप कोणतीही चर्चा नाही. या पार्श्वभूमीवर एका वृत्त वाहिनीच्या कार्यक्रमात फडणवीस म्हणाले की, आमच्याकडे मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून वाद नाही. यावर, फडणवीस यांना एकनाथ शिंदे महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार का? असे विचारले असता फडणवीस म्हणाले, "एकनाथ शिंदे हे राज्याचे प्रमुख आहेत. जी व्यक्ती मुख्यमंत्रिपदावर असते तीच निवडणुकीत नेतृत्व करते. आमचा मुख्यमंत्री असताना दुसऱ्या चेहऱ्याचा विचार होत नाही. मुख्यमंत्रिपदाबाबत संसदीय मंडळ निर्णय घेईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे प्रमुख नेते याबाबत जो निर्णय घेतील तो आम्हा सर्वांना मान्य असेल. सध्या तरी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला जाताना आम्ही सर्वजण सरकार म्हणून लोकांसमोर जाणार आहोत.

भाजपचे संसदीय मंडळ, शिवसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अजित पवार हे सारे मिळून मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतील. हे सर्व नेते घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल."

## श्रींच्या स्वागताची तयारी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**अहमदाबाद :** श्री गणेश उत्सवाच्या पूर्वसंध्येला श्रींच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरवण्यात मग्न असलेला शिल्पकार.

## कॅनडा सरकार संकटात

# खलिस्तानवादी जस्टिन ट्रुडो यांचे भवितव्य धूसर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** खलिस्तानवाद्यांच्या पाठीशी उभे असलेले कॅनडातील जस्टिन ट्रुडो यांचे सरकार संकटात सापडले आहे. गेल्या अडीच वर्षांपासून आघाडीत असलेल्या न्यू डेमोक्रॅटिक पक्षाने तेथील पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या पक्षाशी असलेले संबंध तोडले आहेत. त्यामुळे ट्रुडो सरकार धोक्यात आले आहे. तेथे मध्यावधी निवडणुका होऊ शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मार्च २०२२ मध्ये न्यू डेमोक्रॅटिक पार्टीने लिबरल पक्षासोबत आघाडी सरकार स्थापन केले. दरम्यान, एनडीपीचे नेते जगमीतसिंह यांनी आपण आधीचे सर्व करार रद्द करत असल्याचे सांगितले.

जस्टिन ट्रुडो यांच्या सरकारला संसदेच्या पुढील अधिवेशनापर्यंत टिकून राहायचे आहे. संसदेचे अधिवेशन १६ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. एनडीपीचा पाठिंबा काढून घेतल्यानंतर विरोधी कन्झर्व्हेटिव्ह पक्ष खूश आहे. त्यांनी अविश्वास ठराव आणण्याची तयारी सुरू केली आहे. कॅनडामध्ये ऑक्टोबर २०२५ मध्ये निवडणुका होणार होत्या. मात्र, ट्रुडो यांचे सरकार कोसळले, तर मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतील. मध्यावधी निवडणुकीत आपल्याला संधी असल्याचे तेथील विरोधकांना वाटते.

कॅनडाच्या संसदेत ट्रुडो यांच्याकडे १३० जागा असून, सत्तेत कायम राहण्यासाठी त्यांना किमान नऊ जागांची गरज आहे. यापूर्वी ट्रुडो यांना २४ जागांच्या एनडीपीचा पाठिंबा होता. कन्झर्व्हेटिव्ह पक्षाकडे ११९ जागा आहेत. निवडणूक झाल्यास कन्झर्व्हेटिव्ह पक्षालाही बहुमत मिळू शकते. एनडीपीचे जगमीत सिंह म्हणाले की, ट्रुडो यांनी लोकांना निराश केले आहे. आता त्यांना संधी मिळू नये, असे त्यांनी म्हटले आहे.

## फडणवीस : सव्वादोन वर्षांत ३१४३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक

# देशातील गुंतवणुकीच्या ५२.४६ टक्के महाराष्ट्रात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. महायुती सरकारने सव्वादोन वर्षांत ३१४३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक आणली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट आकडेवारी सादर करत सांगितले आहे.

राज्यात येणारे उद्योग, प्रकल्प परराज्यात जात आहेत. नव्या उद्योगधंद्यांसाठी गुजरात तसेच इतर राज्यांना विशेष प्राधान्य दिले जात आहे, असा आरोप विरोधकांकडून केला जातो. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीकडून राज्यात आतापर्यंत मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक झालेली आहे, असा दावा फडणवीस यांनी केला.

### गुजरात, कर्नाटकपेक्षा जास्त

● ही गुंतवणूक कर्नाटक, दिल्ली, गुजरात यांच्या एकत्रित बेरजेपेक्षा अधिक आहे. तर २०२३-२४ साली १२५१०१ कोटींची गुंतवणूक आली आहे. ही गुंतवणूक गुजरातपेक्षा दुपटीहून अधिक आणि गुजरात तसेच कर्नाटक यांना मिळालेल्या गुंतवणुकीपेक्षा अधिक आहे, असा दावा फडणवीस यांनी केला.



फडणवीस यांनी एक्सच्या माध्यमातून सांगितले, की गेले दोन वर्ष सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात क्रमांक १ वर असलेल्या आपल्या महाराष्ट्रात २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतसुद्धा सर्वाधिक गुंतवणूक आली आहे.

एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत एकूण ७०७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. दुसऱ्या क्रमांकावरील कर्नाटक (१९०५९ कोटी), तिसऱ्या क्रमांकावरील दिल्ली (१०७८८ कोटी), चौथ्या क्रमांकावरील तेलंगणा (९०२३ कोटी), पाचव्या क्रमांकावरील गुजरात (८५०८ कोटी), सहाव्या क्रमांकावरील तामिळनाडू (८३२५ कोटी), सातव्या क्रमांकावरील हरयाणा (५८१८ कोटी), आठव्या क्रमांकावरील उत्तरप्रदेश (३७० कोटी), नवव्या क्रमांकावरील राजस्थान (३११ कोटी) या सर्वांच्या बेरजेपेक्षाही अधिक गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे, असा दावा फडणवीस यांनी केला.

या तिमाहीत देशात आलेली एकूण गुंतवणूक ही १३४९५९ कोटी रुपये इतकी असून, त्यापैकी ७०७९५ कोटी अर्थात ५२.४६ टक्के एकट्या महाराष्ट्रात आली आहे. यापूर्वी २०२२-२३ साली ११८४२२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती.

#रा



## ६ षटके आणि ११३ धावा; ट्रेव्हीस हेडने बनवला महारेकॉर्ड

ऑस्ट्रेलिया आणि स्कॉटलंड यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिकेतील पहिला सामना एडिनबर्ग येथे खेळवण्यात आला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजाने तुफानी खेळी केली. ऑस्ट्रेलियाच्या संघाने पॉवरप्लेमध्ये ११३ धावा केल्या. टी-२० आंतरराष्ट्रीयच्या इतिहासात हा एखाद्या संघाचा पॉवरप्लेमधील सर्वात मोठा स्कोर आहे. याआधी दक्षिण आफ्रिकाने वेस्ट इंडिजविरुद्ध २६ मार्च २०२३ला सेंच्युरियनमध्ये १०२ धावा केल्या होत्या. सामन्यात ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या बॉलवरच जेक फ्रेजर मॅकगर्कची विकेट गमावली होती. मात्र यानंतर ट्रेविस हेड आणि मिचेल मार्श यांनी वादळ आणले. दोघांनी ११३ धावांची पार्टनरशिप केली. हेडने २५ बॉलमध्ये ८० धावा केल्या. यात १२ चौकार आणि पाच षटकार यांचा समावेश आहे. हेडने केवळ १७ बॉलमध्ये अर्धशतक ठोकले.

### चौथी 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धा

# कल्याण क्रिकेट, गट्स अँड ग्लोरी संघ विजयी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत कल्याण क्रिकेट क्लब आणि गट्स अँड ग्लोरी क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत रोहीतसिंग ठाकूर याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर कल्याण क्रिकेट क्लबने स्पार्टन्स् क्रिकेट क्लबचा १०२ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना कल्याण क्रिकेट क्लबने २१८ धावांचा डोंगर उभा केला.

यामध्ये सलामीवीर रोहीत गुगळे याने ६२ धावांची खेळी केली. केतन पासलकर (४६ धावा), सुदर्शन गुणे (३५ धावा) आणि महेश शिंदे (२८ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. या धावसंख्येसमोर स्पार्टन्स् क्रिकेट क्लबचा डाव ११६ धावांवर मर्यादित राहीला. कल्याण संघाच्या रोहीतसिंग ठाकूर याने ३९ धावांत ५ गडी बाद करून स्पार्टन संघाचा निम्मा संघ तंबुत पाठवला.


मिहीर ओक याने केलेल्या फलंदाजीच्या जोरावर गट्स अँड ग्लोरी क्लबने सॅफरॉन क्रिकेट क्लबचा १७ धावांनी पराभव करून स्पर्धेत चौथा विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना गट्स अँड ग्लोरी क्लबने १८८ धावांचे लक्ष्य उभे केले. मिहीर ओक याने ३९ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह ६७ धावांची खेळी केली. गौरव धनवटे याने ४१ धावांचे योगदान दिले. हे लक्ष्य गाठताना सॅफरॉन क्रिकेट क्लबचा डाव १७१ धावांवर मर्यादित राहीला. धावांचा पाठलाग करताना गिरीष कोंडे याने ५५ धावांची खेळी केली.

**सामन्याचा संक्षिप्त निकालः गटसाखळी फेरीः**

- कल्याण क्रिकेट क्लबः २० षटकात ८ गडी बाद २१८ धावा (रोहीत गुगळे ६२ (३०, ३ चौकार, ६ षटकार), केतन पासलकर ४६, सुदर्शन गुणे ३५, महेश शिंदे २८, गिरीष ओक ३-३०, मयुरेश लिखाते २-२५) वि.वि. स्पार्टन्स् क्रिकेट क्लबः १७.३ षटकात १० गडी बाद ११६ धावा (शंतनु गांधी २४, भुषण सवे १९, रोहीतसिंग ठाकूर ५-३९, महेश शिंदे २-१८); सामनावीरः रोहीतसिंग ठाकूर;
- गट्स अँड ग्लोरी क्लबः १८.५ षटकात १० गडी बाद १८८ धावा (मिहीर ओक ६७ (३९, ६ चौकार, ५ षटकार), गौरव धनवटे ४१, कुणाल गुप्ता २९, कुणाल सुर्वे ३-३७, कृष्णा भट ३-२७) वि.वि. सॅफरॉन क्रिकेट क्लबः २० षटकात ८ गडी बाद १७१ धावा (गिरीष कोंडे ५५ (३१, ५ चौकार, ४ षटकार), अनिकेत अटकरी नाबाद २७, श्रीपाद भागवत २५, सुयश भट ४-२५); सामनावीरः मिहीर ओक;

## किल्ले देवगिरी


**दगड काढून किल्ला** बळकट करण्याचे जगातील एकमेव उदाहरण म्हणजे देवगिरी किल्ला होय. जवळ- जवळ दिड लाख टन दगड काढून हा किल्ला तासला आहे. त्याचप्रमाणे नगर कोट, भूदुर्ग व गडकोट याचे समिश्र उदाहरण म्हणजे हा देवगिरी किल्ला होय. प्रत्येक सत्ताधिशाने वेळोवेळी आपल्या परिने नविन बांधकाम केली आहेत. जवळ-जवळ दिड हजार वर्षाचा एकत्रीत दुर्ग बांधणीची अभ्यास होऊ शकतो. किल्ला पाहण्यासाठी अंतरकोटाच्या आत महाकोट, महाकोटाच्या आत कालाकोट, कालाकोट नंतर खंदक व खंदक ओलांडल्या नंतर बालेकिल्ला आहे. या दरम्यान आठ दरवाजे व भुलभुलैया मार्ग किंवा दुसरा मार्ग पायऱ्या खोदलेला आहे. हे सर्व पार करून आपण बालेकिल्ल्याच्या जवळ असलेल्या श्री गणेश मंदिरापाशी येतो. या गणेश मंदिराच्या आतमध्ये मधोमध एक गणपतीची मूर्ती आहे. ही मूर्ती शेंदूर चर्चीत असून मूर्तीच्या मागील बाजूस दगडी महिरप असून या महिरपला टेकूनच गणपतीची मूर्ती आहे. या मूर्तीला सतत शेंदूर लावल्यामुळे मूर्तीवर शेंदूरचा जाडथर तयार झाल्यामुळे मूर्तीवरील कलाकुसर व हातातील शस्त्रे कळून येत नाही. पूर्वी येथे शंकराचे मंदिर असावे असे वाटते. मंदिरात मागील बाजूस तीन मोठे कोनाडे असून त्या कोनाडयात पार्वतीमाता, गणपती व कार्तिकस्वामींची मूर्ती असाव्यात पण सुलतानशाहीत ते नामशेष होवून नंतर कधी तरी येथे गणेशभक्ताने श्री गणेश मूर्ती बसविलेली असावी असे वाटते. किल्ले देवगिरीत असलेले एकमेव भारतमाताचे मंदिर हे अतिशय प्रचंड व तितकेच कलाकुसर केलेले असून, मंदिरात असलेली भारत मातेची मूर्ती फारच सुंदर आहे. त्याबरोबर चॉदमिनार, कुप्पीनुमा मिनार, महाकोट, हत्ती हौद, जैन मंदिर, कालकोट, निजामशाही महाल, मेंढी तोफ, बारादरी, संताची गुफा, गोडया पाण्याची विहिर इत्यादी वास्तु पाहण्यासारख्या आहेत. तसेच देवगिरी हा किल्ला दौलताबाद, धारागिरी, सुरगिरी, देवगड या नावानेही ओळखला जातो. {संदर्भः महाराष्ट्रातील ५०० गड कोट विषयी संकलनीय माहिती शिवसूर्य प्रतिष्ठान, पुणे. टीप:- प:- आपल्या गड-कोटांची असलेली ही वैशिष्टये कृपया जरूर इतर ग्रुपवर शेअर करावी, ही विनंती, धन्यवाद!



गड गणेश
**सुरेश तरलगट्टी**
शिवसुर्य प्रतिष्ठान पुणे

## इटलीचा सिनर पहिल्यांदाच उपांत्य फेरीत; चार सेटमध्ये मात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**न्यूयॉर्क :** अव्वल मानांकित यानिक सिनर याने बुधवारी मध्यरात्री अमेरिकन ओपन टेनिस ग्रँडस्लॅमची उपांत्य फेरी गाठली. इटलीच्या या पठ्ठ्याने पुरुष एकेरीच्या लढतीत रशियाच्या डॅनिल मेदवेदेव याच्यावर ६-२, १-६, ६-१, ६-४ असा चार सेटमध्ये विजय मिळवला आणि पहिल्यांदाच या स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली.

यानिक सिनर याने दुसरा सेट १-६ असा गमावला; पण इतर तीन सेटमध्ये त्याने ६-२, ६-१, ६-४ असे यश मिळवले. ग्रँडस्लॅमचे विजेतेपद मिळवणारा सध्या तो एकमेव टेनिसपटू अमेरिकन ओपन पुरुष एकेरीच्या विभागात कायम आहे. सिनर याने याचवर्षी डॅनिल मेदवेदेव याला पराभूत करीत ऑस्ट्रेलियन टेनिस ग्रँडस्लॅमच्या जेतेपदावर मोहर उमटवली होती.

२३ वर्षीय यानिक सिनर हा अमेरिकन ओपन टेनिस ग्रँडस्लॅम ही स्पर्धा सुरू होण्याच्या एक आठवडा आधी उत्तेजक प्रकरणातून बचावला होता. मार्च महिन्यात दोन वेळा तो उत्तेजक चाचणीत दोषी सापडला होता; पण हे त्याने जाणूनबुजून केले नसल्यामुळे सिनरला निर्दोष ठरवण्यात आले होते.

### दुलीप ट्रॉफीमध्ये मुशीर खानने मोडला तेंडुलकरचा मोठा विक्रम

# २१ चेंडूंत कुटल्या ९४ धावा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** १९ वर्षीय मुशीर खानने दुलीप ट्रॉफीची पहिली फेरी गाजवली. भारत ब संघातून खेळणारे ऋषभ पंत व यशस्वी जैस्वाल अपयशी ठरले असताना मुशीरने संधीचं सोनं केलं. त्यानं शुभमन गिलच्या भारत अ संघाविरुद्ध १८१ धावांची खेळी करून महान फलंदाज सचिन तेंडुकरचा विक्रम मोडला.

मुशीरला नवव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या नवदीप सैनीची साथ मिळाली. या दोघांनी आठव्या विकेटसाठी २०४ धावांची विक्रमी भागीदारी केली. दुलीप ट्रॉफी स्पर्धेतील ८ व्या क्रमांकासाठीची ही सर्वोत्तम भागीदारी ठरली.

मुशीरने पहिल्या दिवशी शतक झळकावले होते आणि आज त्याचे द्विशतकात रुपांतर करेल असे वाटले होते. भारत ब संघाची अवस्था ७ बाद ९४ अशी झाली होती आणि या परिस्थितीत मुशीर मैदानावर उभा राहिला. त्याने नवदीपसोबत २०४ धावा जोडल्या. मुशीरने ३७३ चेंडूंत १६ चौकार व ५ षटकारांसह १८१ धावा चोपल्या. चौकार-षटकारांनीच त्याने २१ चेंडूंत ९४ धावा जोडल्या.

कुलदीप यादवने २९९ धावांवर भारत ब संघाला आठवा धक्का दिला. नवदीप १२७ चेंडूंत ८ चौकार व १ षटकारांसह ५३ धावांवर खेळतोय. दरम्यान मुशीरने महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा मोठा रेकॉर्ड मोडला. तेंडुलकरने दुलीप ट्रॉफीत पदार्पणात १५९ धावांची खेळी केली होती आणि मुशीरने १८१ धावा केल्या. या दमदार कामगिरीनंतर मुशीरला आगामी बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत टीम इंडियात संधी मिळते का याची उत्सुकता आहे.

# 900 गोल करणारा रोनाल्डो पहिला फुटबॉलपटू



**पुणे :** स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने शुक्रवारी पहाटे त्याच्या जगभरातील चाहत्यांना सुखद धक्का दिला. कारकीर्दित ९०० गोल्स करणारा तो जगातील पहिला फुटबॉलपटू ठरला आहे. अल-नासरच्या फॉरवर्डने UEFA Nations Leagueमध्ये क्रोएशियाविरुद्ध हा विश्वविक्रम नोंदवला. रोनाल्डोच्या याच गोलच्या जोरावर पोर्तुगालने २-१ असा फरकाने क्रोएशियाचा पराभव केला. पोर्तुगालसाठी दुसरा गोल डिओगो दलॉटने केला. "या यशाचा माझ्यासाठी खूप मोठा अर्थ आहे," असे रोनाल्डो म्हणाला. "हे एक असे शिखर होते, की जे मला बऱ्याच दिवसांपासून सर करायचे होते. मी यात यशस्वी होईल, याची खात्री होती. मी खेळत राहिलो तर हे शक्य होईल, हे मला माहित होते,"असेही तो म्हणाला. "या विक्रम मला इतर विक्रमांसारखाच वाटतोय. दररोज मेहनत घेणे, शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे आणि त्यानंतर ९०० गोल्स करणे किती कठीण आहे, हे फक्त मला आणि माझ्या सोबतच्या लोकांना माहित आहे. माझ्या कारकिर्दीतील हा एक अविश्वसनीय मैलाचा दगड आहे,"असेही त्याने मान्य केले. वयाच्या ३९ व्या वर्षी रोनाल्डोने दाखवून दिले की तो अजूनही मैदानावर दमदार खेळ करू शकतो.

### गोल्फ कप टूर्नामेंट, बॉक्सिंग, मल्लखांब, डर्ट ट्रॅक रेस स्पर्धांचे आयोजन

# 'पुणे फेस्टिव्हल'मध्ये क्रीडा स्पर्धांची रेलचेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३६व्या 'पुणे फेस्टिव्हल'मध्ये विविध क्रीडा स्पर्धांची रेलचेल असणार आहे.

**गोल्फ स्पर्धा :** पुणे फेस्टिव्हल पूना क्लब गोल्फ टूर्नामेंट रविवारी ८ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३० वा. येरवडा गोल्फ क्लब येथे सुरू होत असून, याचे आयोजन पूना क्लबने केले आहे. याचा बक्षीस वितरण समारंभ दुपारी १२.३० वा. पार पडेल. यंदा १०० हून अधिक स्पर्धक यात सहभागी झाले आहेत. या स्पर्धेचे संयोजन पूना क्लबने केले आहे.

GANESH PUNE FESTIVAL 07 - 17 SEPT. 2024 MAHARASHTRA - INDIA

**बॉक्सिंग स्पर्धा :** पुरुष आणि महिला बॉक्सिंग स्पर्धा शनिवारी १४ सप्टेंबर रोजी भवानी पेठ, येथील वस्ताद लहुजी साळवे स्टेडियम येथे संपूर्ण दिवसभर चालू राहतील. यात एकूण पुरुष व महिला गटांत प्रत्येकी ४० स्पर्धक असून, विविध वजन गटांतील स्पर्धक भाग घेतील. माजी राज्यमंत्री रमेश बागवे व माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनी याचे आयोजन केले आहे.

- पुणे फेस्टिव्हलचे मुख्य क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले आहेत. ३६व्या 'पुणे फेस्टिव्हल'चे महाराष्ट्र पर्यटन विभागाचे पर्यटन संचलनालय आणि कोहिनूर ग्रुप हे मुख्य प्रायोजक असून, पंचशील, सुमा शिल्प लि., भारत फोर्ज आणि नॅशनल एग्ज को-ऑर्डीनेशन कमिटी हे सहप्रायोजक आहेत. डॉ. डी.वाय. पाटील युनिवर्सिटी, बढेकर ग्रुप, अहुरा बिल्डर्स आणि सिंहगड इन्स्टिट्युट हे उपप्रायोजक आहेत.

**मल्लखांब स्पर्धा :** टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र मंडळ येथे बुधवारी ११ सप्टेंबर व गुरुवारी १२ सप्टेंबर या दोन दिवशी महाराष्ट्र मंडळातर्फे १५ वर्षांखालील विविध वयोगटांतील मुले व मुली, स्पर्धकांसाठी पुरलेल्या मल्लखांबावर व रोपवर मल्लखांब स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये ४०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतलाआहे. विविध वयोगटांतील पहिल्या २ विजेत्यांना पुरस्कार दिले जातील. महाराष्ट्र मंडळाचे अभिजित भोसले व सचिन परदेशी यांनी याचे आयोजन केले आहे.

**द डर्ट ट्रॅक रेस :** कोंढवा येथील पालिकेच्या ग्राऊंडमध्ये पुणे फेस्टिव्हल डर्ट ट्रॅक रेसचे आयोजन रविवारी १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० पासून संपूर्ण दिवसभर होणार आहे. ही स्पर्धा विविध गटांत होणार आहे. जिल्ह्यातील १०० हून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहे. 'ऑटोमोटिव्ह रेसिंग मोटरस्पोर्ट्स'तर्फे आयोजन करण्यात आले आहे. फेडरेशन ऑफ मोटर्स स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया यांनी या स्पर्धेस मान्यता दिली आहे.

## सांघिक ब्रिज स्पर्धेमध्ये सह्याद्री संघाला जेतेपद

**पुणे :** पूना विभागीय ब्रिज संघटना (पीआरबीए) आयोजित अविनाश चितळे स्मृती सांघिक ब्रिज स्पर्धेत सह्याद्री संघाने ७० गुणांसह विजेतेपद मिळविले या संघात दिलीप करमरकर, श्रीकांत बेंद्रे, संपत श्रीनिवासन, नितीन शिरोळे, अजय सोनक आणि राजमोहनचा समावेश होता. डेक्कन क्लब हिराबागमध्ये झालेल्या या स्पर्धेत सुभाष भवनानी, अरविंद वैद्य, त्रिभुवन रमणी, गौतम विश्वास, रामअवतार अगरवालचा समावेश असलेल्या रुईया ब्लेझर्स संघाने ६५ गुणासह दुसरा, भरत टीम संघाने ५४ गुणांसह तिसरा क्रमांक मिळविला. या संघात भरत परांजपे, रघुनाथ करमरकर, वासुदेव गुजराथी, जयंत पिंगळे, प्रसन्न भिडे, अरुण घारपुरेचा समावेश होता. चंद्रशेखर देशपांडे, भालचंद्र दक्षिणदास, उमेश आठवले, रवी चंद्रनचा समावेश असलेल्या अमानोरा संघाने ५० गुणासह चौथा, समाधान संघाने ३४ गुणासह पाचवा क्रमांक मिळविला या संघात रवी रमण, ऐवन कन्सेसियो, राजू तोलानी, अजय खरे, राहुल शेट्टी, महेश रोहेराचा समावेश होता तर शिरीष करकरे, नितीन शहा, आनंद सामंत, सुभाष धाक्रस, सुकृत विजयकर, राघवेंद्र रामचंद्रनचा सहभाग असलेल्या ऍक्वेरियस संघाने २८ गुणासह सहावे स्थान मिळविले. स्पर्धेत २९ संघांचा सहभाग होता. विजेत्यांना पीआरबीएचे अध्यक्ष मिलिंद भडभडे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. संचालक म्हणून सुखदेव नय्यर यांनी काम पाहिले.

## कुमार संगकारा केकेआरचा मेंटर होण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** श्रीलंकेचा दिग्गज फलंदाज कुमार संगकारा आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाइट रायडर्सचा (केकेआर) मार्गदर्शक होऊ शकतो. तो संघात गौतम गंभीरची जागा घेणार आहे. गौतम टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक बनल्यानंतर हे पद रिक्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फ्रँचायझीने श्रीलंकेच्या खेळाडूशी संपर्क साधला आहे. सध्या चर्चा सुरू आहे. 46 वर्षीय संगकारा गेल्या मोसमापर्यंत राजस्थान रॉयल्सचा क्रिकेट संचालक होता. त्याला इतर फ्रँचायझींकडूनही ऑफर आहेत.

संगकारासह आरआरने उत्कृष्ट कामगिरी केली संगकाराने 2021 मध्ये राजस्थान रॉयल्सचे क्रिकेट संचालक म्हणून पदभार स्वीकारला. त्यांच्या दिग्दर्शनाखाली आरआर संघाने चमकदार कामगिरी केली आहे. आयपीएल 2022 मध्ये राजस्थानचा संघ अंतिम सामना खेळला होता. मात्र, गुजरात टायटन्सविरुद्धची दुसरी ट्रॉफी उचलण्यात संघाला मुकावे लागले. तर गेल्या मोसमात क्वालिफायर-2 गमावल्यामुळे संघ अंतिम फेरीत पोहोचू शकला नव्हता.

### राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेचे 'एमआयटी एडीटी'त यशस्वी आयोजन

# बीजेएस वाघोली संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा कबड्डी संघटना व विद्यार्थी कल्याण विभाग एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीजेएस वाघोली महाविद्यालयाने १८ गुणांनी बाजी मारली.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्याने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीजेएस वाघोली संघाने मराठवाडा मित्र मंडळ इंजिनिअरींग महाविद्यालयाचा (एमएमसीओई) ५५-३७ अशा दणदणीत फरकाने पराभव केला. बीजेएस वाघोलीच्या यशात हर्षल दौधार व दर्शन रणदिवे या खेळाडूंनी जोरदार आक्रमणांसह संघाच्या गुणांत भर घातली. तर दुसरीकडे, एमएमसीओईकडून ऋषीकेश सोनवणे याने बहारदार कामगिरी केली खरी, परंतू तो संघाला विजयापर्यंत पोहोचू शकला नाही.

पहिल्या सत्रात बीजेएस वाघोलीने २ लोण व २ बोनससह एकूण २२ गुणांची कमाई केली. दुसरीकडे, एमएमसीओईने देखील चांगली झुंज देताना १९ गुण मिळविले. मात्र, सामन्याच्या दुसऱ्या सत्रात, बीजेएस वाघोलीच्या खेळाडूंनी केलेल्या आक्रमणासमोर एमएमसीओईच्या खेळाडूंची पुरती धांदल उडाली. या निर्णायक सत्रात बीजेएसने तब्बल ३३ गुणांची लयलूट केली, तर एमएमसीओई केवळ १८ गुण मिळवता आले. ज्यामुळे, १८ गुणांच्या फरकासह बिजेएस वाघोलीला विजेतेपदाचा मान मिळाला. विजेत्या संघाला, माजी कबड्डीपटू आप्पासाहेब दळवी, क्रीडा विभाग संचालक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. पद्माकर फड, आशियाई रोइंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविणारे प्रा.आदित्य केदारी, विद्यार्थी कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.सुराज भोयार, ऑलिंपियन बॉक्सर मनोज पिंगळे यांच्या हस्ते करंडक, रोख रक्कम अशा स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कबड्डी प्रशिक्षक क्षिप्रा पैठणकर यांनी विशेष मेहनत घेतली.

#रा